


# कृष्णा एक्सप्रेस

संपादक - गोरख काशिनाथ तावरे



* कराड (जि.सातारा) * वर्ष - १ ले. * अंक २६३ वा. * शुक्रवार दि.२५ एप्रिल २०२५ * पृष्ठे ४ * किंमत : १ रुपये * RNI NO : MAHMAR/2024/86610

* Karad (Dis.Satara) * Vol - 1 * Ishue - 263 * Friday 25 April 2025 * Page - 4 * Price - 1 Rs. * RNI NO : MAHMAR/2024/86610

## गुप्तचर यंत्रणेतील त्रुटी सरकारला मान्य

### पहलगाम दहशतवादी हल्ल्याबाबत सरकारची स्पष्टोक्ती



नवी दिल्ली : पहलगाम दहशतवादी हल्ल्यात २६ निष्पाप पर्यटकांचा दुर्दैवी मृत्यू झाला. या हल्ल्यानंतर भारत सरकारने पाकिस्तावर विविध प्रकारचे निर्बंध लादले आहेत. याशिवाय, या घटनेबाबत संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांच्या अध्यक्षतेखाली दिल्लीत सर्वपक्षीय बैठक पार पडली. बैठकीतील सर्व पक्षांनी या दहशतवादी हल्ल्याचा निषेध केला. यावेळी सरकारने सुरक्षेत चूक झाल्याचे मान्य केले.

केंद्रीय मंत्री किरेन रिजिजू म्हणाले, ही एक अतिशय दु:खद घटना आहे. गेल्या अनेक वर्षांपासून काश्मीरमध्ये लोक शांततेत आपले व्यवसाय करत होते, पर्यटक येत होते, सर्व काही अगदी व्यवस्थित सुरू होते. पण, नेमकी कुठे चूक झाली, हे आम्ही शोधून काढू. भविष्यात अशा घटना रोखण्यासाठी व्यवस्था करण्यात येईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. यावेळी सर्व पक्षांच्या नेत्यांनी एका सुरात **(पान ४ वर)**

## सह्याद्रीच्या संचालकांचा पेरले येथे सत्कार



कराड : सह्याद्रि सहकारी साखर कारखाना लि. यशवंतनगरच्या पंचवार्षिक निवडणुकीतील नवनिर्वाचित संचालकांचा तसेच चेअरमनपदी राज्याचे माजी सहकार व पणन मंत्री श्री.बाळासाहेब पाटील व व्हा.चेअरमनपदी श्री.कांतीलाल पाटील यांची बिनविरोध निवड झाली त्याबद्दल त्यांचा नागरी सत्कार समारंभ पेरले (ता. कराड) येथे संपन्न झाला.

यावेळी गावातील विविध संस्थांच्या वतीने देखील सत्कार करण्यात आला. प्रारंभी जम्मू काश्मीर येथील पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्याचा निषेध करून, हल्ल्यात मृत्यु झालेल्या नागरिकांना श्रद्धांजली वाहण्यात आली. याप्रसंगी कराड उत्तर राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष देवराजदादा पाटील, राष्ट्रीय कॉंग्रेसचे सरचिटणीस अजितराव पाटील-चिखलीकर, सभेचे अध्यक्ष शहाजीराव चव्हाण, पै. संजय थोरात, उद्धवराव फाळके, तानाजीराव साळुंखे, भास्करराव गोरे, लक्ष्मण निकम, डी बी जाधव, वसंत शिंदे, संजय गोरे, विजय निकम, जयंत जाधव, चंद्रोजी मोहिते, दिलीप थोरात, यशवंत थोरात, सरपंच सौ. राणी गुरव, राजेंद्र भोसले, तसेच ग्रामस्थ उपस्थित होते.

## सफाई कर्मचाऱ्यांना सोयी-सुविधा उपलब्ध करुन द्या

### राज्य सफाई कर्मचारी आयोग अध्यक्ष शेरसिंग डागोर



सातारा : जिल्हा परिषद व नगर पालिका अंतर्गत येणारे सफाई कर्मचारी आपले आरोग्य धोक्यात घालून शहर तसेच गावे स्वच्छ करीत आहेत. यामुळे त्यांच्या आरोग्यावरही परिणाम होत आहे. माणुसकीच्या दृष्टीकोणातून त्यांच्याकडे पहावे व त्यांना सोयी-सुविधा उपलब्ध करुन द्याव्यात, असे निर्देश राज्य सफाई कर्मचारी आयोग अध्यक्ष शेरसिंग डागोर यांनी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयात श्री. डागोर यांनी सफाई कर्मचाऱ्यांच्या सोयी-सुविधांबद्दल आढावा घेतला. या आढावा बैठकीला जिल्हाधिकारी संतोष पाटील, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी विश्वास सिद, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. युवराज करपे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. महेश खलीपे, समाज कल्याणचे सहायक आयुक्त सुनिल जाधव, नगर प्रशासन अधिकारी अभिजीत बापट यांच्यासह जिल्ह्यातील सर्व नगर पालिका व नगर पंचायतींचे मुख्याधिकारी उपस्थित होते.

सफाई कर्मचाऱ्यांच्या आरोग्याच्यादृष्टीने आयुष्यमान भारत कार्ड काढावे, असे निर्देश देऊन श्री. डागोर म्हणाले, फलटण नगरपालिकेने सफाई कर्मचाऱ्यांची हेल्थ पॉलीसी काढली आहे. त्याप्रमाणे इतर नागरपालिकांनी कार्यवाही करावी. शहराची व गावांची लोकसंख्या वाढत आहे एक हजार लोकसंख्येमागे एक सफाई कर्मचारी असला पाहिजे. वाढीव कर्मचाऱ्यांसाठी प्रस्ताव शासनाकडे सादर करावा. सफाई कर्मचारी निवृत्त झाल्यावर त्यांचे निवृत्ती वेतन त्वरीत मिळाले पाहिजे त्याला कार्यालयात हेलपाटे मारायला **(पान ३ वर)**

## कराड तालुक्यातील २०१ ग्रामपंचायतीचे सरपंचपदाचे आरक्षण सोडत

कराड : कराड तालुक्यातील २०१ ग्रामपंचायतींसाठी अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, नागरिकांचा मागास प्रवर्ग व सर्वसाधारण या प्रवर्गासाठी सरपंच पदे आरक्षित करणेत आली आहेत. तहसिलदार कल्पना ढवळे यांचे अध्यक्षतेखाली यशवंतराव चव्हाण स्मृती सदन येथे तालुक्यातील २०१ ग्रामपंचायतीचे आरक्षण जाहीर करणेत आले आहे.

**अनुसूचित जाती महिला :** आणे, आरेवाडी, बेलवाडी, चोरजवाडी, विठोबाचीवाडी, घोणशी, भोसलेवाडी, वडोली भिकेश्वर, केसे, बनवडी, मालखेड, खोडशी**अनुसूचित जाती :** शेळकेवाडी (म्हासोली), भोळेवाडी, बामणवाडी, सयापूर, वराडे, येवती, विरवडे, हनूमानवाडी, हवेलवाडी, माळवाडी, पवारवाडी, नडशी

**अनुसूचित जमाती महिला :** नडशी, सुपने, हरपळवाडी, राजमाची, तासवडे, येळगाव, किरपे, मरळी

**नागरिकांचा मागास प्रवर्ग :** वाठार,ज़पाडळी (केसे), करवडी, येरवळे, विंग, रेठरे खुर्द, मेरवेवाडी, आदर्शनगर, कोयनावसाहत, वाण्याचीवाडी, संजयनगर (शेरे), वाघेश्वर, ओंडोशी, निगडी, वडगाव उंब्रज, पाल, टेंभू, खालकरवाडी, म्हासोली, अंबवडे


**नागरिकांचा मागास प्रवर्ग महिला :** कोरेगाव, शेणोली, नांदगाव, सैदापूर, कुसुर, कोपर्डे हवेली, कळंत्रेवाडी, मस्करवाडी, धनकवडी, वसंतगड, चिंचणी, अंधारवाडी, हणबरवाडी, पाचुपतेवाडी, चौगुलेमळा (भैरवनाथनगर), पाडळी हेळगाव, बेलवडे हवेली, कोर्टी, वडगाव हवेली, वाघेरी, कोणेगाव, उत्तर तांबवे, वनवासमाची (स.गड), घोगाव, वारुंजी, तळबीड, खराडे

**सर्वसाधारण महिला प्रवर्ग :** शेवाळेवाडी (उंडाळे), वडोली निळेश्वर, गोळेश्वर, कोळेवाडी, किवळ, इंदोली, शहापूर, कार्वे, पाचुंद, हजारमाची, वस्ती साकुर्डी, काले, कोरीवळे, पश्चिम सुपने, गोवारे, शामगाव, संजयनगर (काले), दुशेरे, उत्तर कोपर्डे (यादववाडी), बाबरमाची पु.डिचोली, तारुख, वहागाव, चिखली, शिरवडे, गोडवाडी, अक्काईचीवाडी, महारुगडेवाडी, साबळवाडी, भरेवाडी, गोटेवाडी, कामथी, पोतले, जुळेवाडी, शेवाळेवाडी (म्हासोली), जिंती, नारायणवाडी, शितळवाडी, लटकेवाडी, शेळकेवाडी (येवती), कचरेवाडी, हिंगनोळे, बेलवडे बु., जखिणवाडी, गोंदी, नांदलापूर, चचेगाव, सुर्ली, बाबरमाची, मनु, हेळगाव, गणेशवाडी, सावरघर, करंजोशी, जुजारवाडी, कालवडे, कालगाव, साकुर्डी, पिंपरी, उंब्रज, कासारशिंबे, चरेगाव, धोंडेवाडी

**सर्वसाधारण :** रिसवड, जुने कवठे, पेरले, साळशिरंबे, यशवंतनगर, अंतवडी, कापील, येणके, भुयाचीवाडी, गमेवाडी, खोडजाईवाडी, तुळसण, कालेटेक, येणपे, साजुर, ओंड, शिवडे, सवादे, गोसावेवाडी, लोहारवाडी, बानुगडेवाडी, उंडाळे, भांबे, शेरे, तांबवे, गोटे, मसूर, बेलदरे, नवीन कवठे, वनवासमाची (खो.), यादववाडी, घराळवाडी, टाळगाव, अबाईचीवाडी, आटके, मुनावळे, धावरवाडी, हणमंतवाडी, गायकवाडवाडी, वानरवाडी, कोडोली, डिचोली, मुनावळे, शिरगाव, विजयनगर, कांबीरवाडी, कोळे, घारेवाडी, भवानवाडी, शिंगणवाडी, नाणेगाव, डेळेवाडी, शिंदेवाडी (विंग), मागणीवाडी, चोरे, पारले, खुबी, मुंढे, भुरभुशी, म्होप्रे, रेठरे बु.घोलपवाडी.

ग्रामपंचायतीचे आरक्षण सोडत शांततेत व सुरळीत पार पडले. आरक्षण सोडत कार्यक्रमास उपविभागीय अधिकारी श्री. अतुल म्हेत्रे, श्रीम. कल्पना ढवळे, निवासी नायब तहसीलदार श्री. बी. के. राठोड, महसुल नायब तहसिलदार श्री. महेश उबारे, निवडणूक नायब तहसीलदार श्री. हेमंत बेस्के, सहा. महसुल अधिकारी, श्री. युवराज काटे, सहा. महसुल अधिकारी, श्री. युवराज पाटील, सहा. महसुल अधिकारी, श्री. राजेश सपकाळ, महसूल सहायक श्री. आनंदराव पोळ, महसूल सहायक श्री. आदिनाथ मंडले, महसूल सहायक श्री. प्रसाद देशपांडे, महसुल सहायक, श्री. प्रकाश नागरगोजे, महसुल सहायक, श्री. सुरज लोकरे, महसुल सेवक व श्री. अभिजीत रावते, मग्रारोहयो मदतनीस व २०१ गावातील ग्रामस्थ उपस्थित होते.

## पर्यटकांसाठी विशेष विमानाची व्यवस्था करावी:पृथ्वीराज चव्हाण



कराड : जम्मू काश्मीर मधील पहलगाम येथे अतिरेक्यांनी केलेल्या भ्याड हल्ल्यात २७ ते ३० पर्यटकांचा मृत्यू झाला असून अनेक पर्यटक गंभीर जखमी झाले आहेत, तसेच झालेल्या घटनेमुळे देशातील अनेक पर्यटक जम्मू काश्मीर मध्ये अडकले असल्याच्या बातम्या आहेत.

त्यामध्ये कराड व साताराचे सुद्धा पर्यटक अडकले असल्याची माहिती मिळताच माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी कराडचे पर्यटक महेश कुलकर्णी यांच्याशी संपर्क साधून परिस्थितीची माहिती घेतली. अजूनही कराडचे पर्यटक मदतीच्या प्रतीक्षेत असल्याची माहिती श्री कुलकर्णी यांनी पृथ्वीराज बाबांना दिली.

यावेळी पृथ्वीराज बाबांनी श्री कुलकर्णी यांना आधार देत संयम ठेवण्याची विनंती केली, तुम्हाला मदत नक्की मिळेल तुम्ही लवकरात लवकर कराड ला पोहचाल यासाठी आम्ही प्रयत्न करू असे आश्वासन पृथ्वीराज बाबांनी दिले. श्री कुलकर्णी यांच्या सोबत बोलण झाल्यानंतर पृथ्वीराज बाबांनी तात्काळ परराष्ट्र सचिव व महाराष्ट्राच्या सचिवांशी संपर्क साधून कराडच्या तसेच महाराष्ट्रातील सुद्धा पर्यटकांना लवकरात लवकर आणण्यासाठी सरकारने विशेष विमानाची व्यवस्था करण्याची मागणी यावेळी केली. प्रशासनाने जलद यंत्रणा कामाला लावावी असे सांगून कराड व सातारा मधील अडकलेल्या पर्यटकांची यादी सचिवांना पाठवली. त्यानुसार महेश कुलकर्णी यांना संपर्क करून माहिती दिली. अगदी डायरेक्ट पुणे किंवा मुंबई पर्यंत जरी व्यवस्था नाही झाली तरी दिल्ली पर्यंत तरी या तुमच्या सर्वांची राहण्याची व्यवस्था दिल्लीत केली जाईल असा आधार पृथ्वीराज बाबांनी कराडच्या कुलकर्णी व क्षीरसागर कुटुंबियांना दिला.

## कराडमध्ये २६ एप्रिलला श्री स्वामी समर्थ पुण्यतिथी सोहळा

कराड : सालाबादप्रमाणे श्री स्वामी समर्थ कृपेने शनिवार दि. २६ एप्रिल २०२५ रोजी पुण्यतिथी सोहळ्यानिमित्त महाप्रसादाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. या सोहळ्याप्रसंगी अगत्यपुर्वक उपस्थित राहावे असे आवाहन श्री स्वामी समर्थ भक्त विजयसिंह यादव यांनी केले आहे.

२६ एप्रिल रोजी सायंकाळी सात ते दहा या वेळेत महाप्रसाद होणार असून शाळा नं. ३, हेड पोस्ट ऑफिसजवळ, शनिवार पेठ, कराड येथे श्री स्वामी समर्थांचे सर्व धार्मिक कार्यक्रम होणार आहेत. लोकशाही आघाडीचे अध्यक्ष, माजी उपनगराध्यक्ष राजेंद्रसिंह यादव, श्री स्वामी समर्थ भक्त विजयसिंह यादव, प्रशांत यादव, संजय यादव, शिवरत्न यादव, देवराज यादव, रुद्रप्रतापसिंह यादव संग्राम सणस यांच्या उपस्थितीत श्री स्वामी समर्थ पुण्यतिथी सोहळा संपन्न होणार आहे.

## डोंगरावर लागलेला वणवा आला आटोक्यात; वनसंपदेचे नुकसान टळले



सातारा-वळसे ता. सातारा येथील पुरातन महादेव मंदिर असलेल्या डोंगरावर अज्ञाताने वणवा लावला. वळसे येथील ग्रामस्थ व युवकांच्या लक्षात ही बाब आल्यानंतर त्यांनी तातडीने वन विभागाच्या अधिकाऱ्यांशी संपर्क साधला. यांनतर वन विभागाचे कर्मचारी व गावातील १० ते १२ युवकांनी वणवा आटोक्यात आणून वनसंपदेचे नुकसान टाळले.

वळसे येथील लगतच्याडोंगरावर महादेवाचे पुरातन मंदिर आहे. या डोंगरावर जानाई मळाई डोंगराच्या बाजूने अज्ञात व्यक्तीने सायंकाळी ५ च्या सुमारास आग लावली. काही वेळातच आगीने रौद्ररूप धारण केले. डोंगरावर वणवा लागल्याचे गावातील ग्रामस्थ महेंद्र कदम, नितीन कदम, तेजस कदम, पार्थ कदम, गणेश कदम, विघ्नेश सुतार, राज कदम, मयूर निंबाळकर, सुरज जाधव, स्वप्नील चव्हाण आदी युवकांच्या निदर्शनास आले. त्यांनी तात्काळ वनरक्षक अभिजित कुंभार यांच्याशी सपर्क करून त्यांना पाचारण केले. कुंभार व त्यांचे कर्मचारी वणवा आटोक्यात आणण्यासाठीचे कदम आणि चंद्रकांत उर्फ बाळा कदम, विपुल कदम, ऋतुराज गोडसे, प्रथमेश आवश्यक साहित्य घेऊन घटनास्थळी दाखल झाले.

वन विभागाचे अधिकारी व कर्मचारी आणि युवकांनी डोंगावर धाव घेवून अथक परिश्रम घेत वणवा आटोक्यात आणला. यामुळे वनसंपदेचे मोठे नुकसान टळले. वळसे गावातील ग्रामस्थ आणि युवक नेहमीच दक्ष राहून डोंगरावर वणवा लागू नये याची काळजी घेत असतात. यावेळीही त्यांनी तत्परता दाखवून वणवा आटोक्यात आणण्यासाठी मोलाची मदत केली, याबद्दल वन विभागाच्यावतीने कुंभार यांनी सर्वांचे आभार मानले. तसेच कोणीही वणवा लावू नये, सर्वांनी वनसंपदेचे रक्षण करावे असे आवाहन त्यांनी केले.

## ढेबेवाडीत पार्कींगची पुन्हा लगाम झाली सैल



ढेबेवाडी(महेश जाधव) : ढेबेवाडी झेंडाचौक परीसरात दुचाकी वाहने अस्ताव्यस्त पार्कींग केल्याने अवजड वाहनांना व पादचारी नागरीकांना ये-जा करताना याचा नाहक त्रास होत आहे.

झेंडाचौक परीसरात भाजी मंडई , महाराष्ट्र बँक ,रस्त्याच्या दोन्ही बाजुला व्यापांर्यांची दुकाने असल्याने या ठीकाण नागरीकांची वर्दळ ही कायम असते.मात्र त्या ठीकाणी आसपासच्या गावावरुन बाजार पेटेत आलेले दुचाकी वाहनदार मुख्य वाहतुकीच्या रस्त्याच्या ठीकाणी वाहन पार्कींग करतात .त्यामुळे त्या ठीकाणी वाहतुक कोंडी होत आहे.

गेल्या काही दिवसापुर्वी संबंधीत पोलीस विभागाने बेशीस्त वाहन पार्कींग करणाऱ्यांवर बेधडक कार्यवाही करण्याचे डोस दिले होते.त्यामुळे काही दीवस बेशीस्त वाहन पार्कींगला चांगलीच लगाम बसलेली मात्र आज ढेबेवाडीच्या मुख्यबाजार पेटेत दुचाकीवाहने बेशिस्त पणे पार्कींग केल्याने वाहन शिस्थीची लगाम सैल झाल्याचे चित्र दिसुन येत असल्याने ढेबेवाडी बाजारपेठेतील बेशीस्त वाहन पार्कींगला आळा बसणार तरी कदी असा प्रश्न सर्व सामान्य गागरीकांच्यातुन उपस्थित केला जात आहे.

ढेबेवाडी मुख्य बाजारपेट असल्याने आसपासच्या गावातील नागरीक या ठीकाणी रोज खरेदीसाठी येत असतात. दुचाकी वाहनदारकांनी जर मुख्य रस्त्यावर वाहन पार्कींग न करता ढेबेवाडी बाजारतळ या ठीकाणी वाहने पार्कींग केली तर चौकात होणाऱ्या वाहतुक कोंडीला चांगलाच आळा बसेल.

**प्रसाद देवळेकर,**
ग्रा.पं.स.ढेबेवाडी.

## अपघातात युवकाचा जागीच मृत्यू



ढेबेवाडी : गुढे (ता. पाटण) येथील कराड ढेबेवाडी रोडवरती गुढे स्टॉपवरील एस. टी पिकअप शेडवरती अँपे रिक्षा (एम.एच ५०एम ८५७३) धडक बसल्याने कुठरे सुपुगडेवाडी येथील रिक्षा चालक विजय यशवंत सुपुगडे (वय २८) हा जागीच मृत्यू झाला आहे.

मिळालेले माहिती नुसार विजय सुपुगडे हा रिक्षा घेऊन ढेबेवाडीहून तळमावळेच्या दिशेने निघालेला होता. रिक्षा चालकाचा रिक्षावरील ताबा सुटल्याने रिक्षा रस्त्याच्या बाजूवरील पिकअप शेडवरती धडकली आणि रिक्षाचालक जागीच ठार झाला. अपघात एवढा भयानक होता की रिक्षाचा चक्काचूर आहे.

## संपादकीय....

# दबाव वाढू लागला...!

पहलगाम हल्ल्याची तुलना हमासने इस्त्रायलवर केलेल्या हल्ल्याशी होऊ लागली आहे. त्यामुळे आता पाकिस्तानविरोधात लष्करी कारवाई करण्यासाठी सरकारवर दबाव वाढू लागला आहे. पहलगाममध्ये हिंदू धर्मियांना वेचून लक्ष्य केल्याचे स्पष्ट झाले आहे. बैसरनमध्ये मंगळवारी झालेल्या हल्ल्यात सात दहशतवाद्यांचा सहभाग असल्याचे प्राथमिक तपासात समोर आले असून त्यातील चार ते पाच जण हे पाकिस्तानातून घुसखोरी करून आले असल्याची शक्यता आहे. हल्लेखोरांच्या शरीरावर कॅमेरे लावण्यात आल्याची शंकाही जम्मू-काश्मीरमधील एका पोलिस अधिका-याने बोलून दाखवली. हल्लेखोरांसमवेत किमान दोन स्थानिक अतिरेकी असावेत असाही अंदाज आहे.

गत काही वर्षांपासून अशा हल्ल्यांमध्ये अतिरेक्यांच्या कपड्यांवर किंवा त्यांच्या बंदुकांवर कॅमेरे लावलेले असतात. नरसंहाराचे चित्रीकरण करून त्याचा दुरुपयोग केला जातो. पहलगाममध्ये निरपराध पर्यटकांचा बळी गेल्याने त्याचा बदला घेण्याची संतप्त लोकभावना व्यक्त होत आहे. हल्ल्याच्या निषेधार्थ काश्मीरमध्ये कडकडीत बंद पाळण्यात आला. गत ३५ वर्षांत काश्मीरमध्ये असे कधी घडले नव्हते. पहलगाम हल्ल्याविरुद्ध कडक कारवाई केली जाईल. दहशतवाद्यांना सोडले जाणार नाही. भारत योग्य वेळी प्रत्युत्तर देईल. दहशतवादाविरुद्ध आमचे शून्य सहनशीलतेचे धोरण आहे, अशा शब्दांत संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांनी संताप व्यक्त केला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी आपला सौदी अरेबियाचा दौरा अर्धवट सोडून तातडीने भारतात परतले. त्यांनी परिस्थितीचा आढावा घेतला. राजधानीत दिवसभर उच्चस्तरीय बैठकांचा सिलसिला सुरू होता. सुरक्षा यंत्रणांनी तीन पाकिस्तानी दहशतवाद्यांची स्केचेस प्रसिद्ध केली असून त्यांची पहलगाम जंगलात नाकाबंदी करून कसून शोध घेतला जात आहे.

पंतप्रधान मोदी यांनी दिल्ली विमानतळावरच राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोभाल, परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर यांची भेट घेतली. संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांनी चीफ ऑफ डिफेन्स स्टाफ, जनरल अनिल चौहान, तिन्ही लष्करी दलांचे प्रमुख, संरक्षण सचिव आणि लष्करी संचालनालय प्रमुख यांची बैठक घेऊन सुरक्षेचा आढावा घेतला. तसेच लष्कराला युद्धाच्या तयारीत राहण्याचे आणि दहशतवादविरोधी कारवायांची मोहीम तीव्र करण्याचे आदेश दिले. कलम ३७० हटवल्यानंतर काश्मीरमध्ये पहिल्यांदाच इतका मोठा दहशतवादी हल्ला झाला आहे. दहशतवाद्यांना आणि त्यांच्या समर्थकांना योग्य उत्तर देणे आता अनिवार्य बनले आहे. दहशतवादाविरुद्ध लढण्याची प्रतिज्ञा घेण्यासोबतच ती साध्य करण्यासाठी ठोस रणनीती आखावी लागेल. पाकिस्तानमधील तळांवरून कार्यरत असलेल्या दहशतवादी संघटनांनी सुरक्षा दलाच्या छावण्यांवर हल्ला करण्याबरोबरच सर्वसामान्य नागरिकांवरील हल्ल्यांची रणनीती अवलंबण्यास सुरुवात केली आहे. यामागील हेतू पर्यटन वा इतर कारणांसाठी काश्मीरमध्ये येणा-यांमध्ये भीती निर्माण करणे हा आहे. दहशतवाद्यांनी केवळ पर्यटकांनाच मारले नाही, तर काश्मिरी जनतेच्या पोटावरही लाथ मारली आहे. या भयंकर हल्ल्यानंतर खो-यातील पर्यटनाशी संबंधित व्यवसायही जवळपास ठप्प होण्याची शक्यता आहे. केंद्र सरकारने पाकिस्तानची नाकेबंदी करण्यास सुरुवात केली आहे.

भारताने या हल्ल्यानंतर पाकिस्तानवर थेट आरोप केला असून पाकिस्तानी दूतावास बंद करण्यास सांगितले आहे. पाकिस्तानी नागरिकांचे व्हिसा रद्द करण्यात आले आहेत. अटारी चेकपोस्ट बंद करण्यात आला आहे. १९६० साली लागू झालेला सिंधू पाणी करार भारताने रद्द केला आहे. पाकिस्तानवर याचा मोठा परिणाम होणार आहे. 'सार्क'अंतर्गत पाकिस्तानी नागरिकांना देण्यात येणारी व्हिसा सूट रद्द करण्यात आली आहे. भारतात राहणा-या पाकिस्तानी नागरिकांना ४८ तासांच्या आत भारत सोडण्यास सांगण्यात आले आहे. भारतातील सर्व पाकिस्तानी लष्करी सल्लागारांनाही एका आठवड्याच्या आत भारत सोडण्यास सांगण्यात आले आहे. पाकिस्तानची २३ टक्के अर्थव्यवस्था आणि ३४ टक्के कर्मचारीवर्ग सिंधू नदीच्या पाण्यावर अवलंबून आहे. पाकिस्तानच्या एकूण पाण्यापैकी ८५ टक्के पाणी सिंधू आणि तिच्या उपनद्यांमधून येते.

भारताच्या पाणीबंदीमुळे पाकिस्तानातील शेती, उद्योग आणि दैनंदिन जीवनावर गंभीर परिणाम होणार आहे. पाकिस्तानच्या अर्थव्यवस्थेला हा धक्का इतका मोठा असेल की त्यामुळे सामाजिक अस्थिरता आणि आंतरराष्ट्रीय तणाव वाढू शकेल. आंतरराष्ट्रीय कायद्यानुसार पाण्याचा प्रवाह रोखणे हे युद्धाचे कारण ठरू शकते. भारताचा हा निर्णय केवळ पाकिस्तानपुरता मर्यादित नाही. बांगलादेशच्या सरकारलाही हा इशारा आहे. पहलगाम हल्ल्यामागे सैफुल्लाह खालिद कसुरीचा हात असल्याचे भारताने म्हटले आहे. परंतु या हल्ल्यामागे आपला हात नसल्याचे त्याने म्हटले आहे. या हल्ल्याचा पाकिस्तानशी काहीही संबंध नाही.

# धार्मिक उन्मादांचे हे मानवतेवर वाढते हल्ले

स्वतःच्या स्वार्थासाठी आत्मकेंद्री बनत गेलेल्या माणसाने मानवतेला हतबल करून दानवतेशी सख्य केले आहे. त्यामुळेच निरपराधांना बेछूट गोळीबारातून रक्तांच्या थारोळ्यात झोपवणारे आत्मघातकी हल्ले सुरू झालेले आहेत.परवा काश्मिरमधील पहेलगाममध्ये दहशतवाद्यांनी निरपराध पर्यटकांवर केलेल्या गोळीबाराचे कौर्य हा देशाच्या अस्मितेवर झालेला आघात होता.या हल्ल्यांचा जाहिर निषेध व्यक्त झालेला आहे.

मानवतेवर झालेला एक भयानक हल्ला होता.असे हल्ले घडवून भारतात आणि जम्मू-काश्मिरमध्ये शांततेला आव्हान देऊन सतत अशांतता धुमसत ठेवण्याचे दहशतवाद्यांचे प्रयत्न सतत सुरू असतात.परंतू परवा झालेला हल्ला हा पुलवामामध्ये आरडीएक्स स्फोटानंतरचा सर्वात मोठा हल्ला होता. लष्कर - ए- तोयबाशी संबंधित टीआरएफ या दहशतवादी संघटनेने या हल्ल्याची जबाबदारी स्विकारली आहे.एवढेच नाही तर पंतप्रधान नरेंद्र मोदींना हा आम्ही केलेला हल्ला आहे म्हणून जाऊन सांगा असा मग्रूरपणा सुध्दा केलेला आहे. एवढा उघड संदेश म्हणजे छपन्न इंचीला दिलेले आव्हान आहे. यातून काय धडा घ्यायचा तो सत्ताधाऱ्यांनी घ्यावा.कारण बुध्दीवादाच्या कक्षा ह्या त्यांच्यानंतर धुसरच झालेल्या आहेत असे ते नेहमी समजत असतात. पुलवामाचा हल्ला लोकसभा निवडणूकांचा पूर्वसंध्येला घडला होता.तसाच हा सुध्दा हल्ला बिहार निवडणूकांपूर्वी झालेला आहे.या चिंतनिय विषयाकडे आता देशाचे लक्ष केंद्रीत झालेले आहे.त्यामुळे जनतेचे ते सुध्दा लक्ष विचलित करण्यासाठी आता काय होईल हे पाहणे औत्सुक्याचे राहणार आहे.

शांततेशिवाय मानवी आयुष्ये कुणा लाभली शांततामय सुलभ पध्दतीने जीवन जगून विकासाच्या दिशेने जाण्यासाठी देशात शांतता प्रस्थापित करण्याचे प्रयत्न होणे ही सर्वात मोठी महत्वाची क्रांतिकारी पाऊले ठरणार आहेत .त्यासाठी काय करावे लागेल?कोणत्या उपाययोजना कराव्या लागतील? या प्रश्नांवरील चिंतनातून प्राधान्याने निश्चित कृतिशील कायम करणे हे केन्द्र सरकारचे आद्यकर्तव्य आहे.

परंतू हा विचार सोडून फक्त राजकारण आणि सत्तेच्या विस्तारीकरणासाठीच पूर्ण शक्ती खर्च होत असेल तर देशातील निरपराधांवर असेच हल्ले होत राहणार आहेत.मग संरक्षण आणि गृहखाते काय करते हे प्रश्न विचारण्याचा संविधानिक अधिकार जनतेला निश्चितच आहे. हल्ले होतात,देशातील माणसं मरतात.मग मदतीच्या रक्कमा देऊन कोरड्या सहानुभूतीने ही प्रकरणं विसरायला भाग पाडलं जातं.कारण येथे माणसाच्या सांडणाऱ्या रक्तापेक्षा सत्ता काबिज करून ति वर्षानुवर्षे ताब्यात ठेवणे या राजकीय



मतलबाला फक्त किंमत आहे. जिथे जिथे १०- १२ वर्ष शांतता राहिली. तिथले सैन्यदल आणि पोलिस दुसरीकडे हलविल्यानंतरच त्या बेसावधतेचा फायदा घेऊन यापूर्वी आतिरेक्यांकडून असेच हल्ले झालेले आहेत.मग हि ठेच लागल्यावर सुध्दा शांततामय भागातील सैन्य आणि पोलिस दुसरीकडे घेऊन जाणे हे केन्द्र सरकारच्या गृहविभागाचे फार मोठे शहाणपण समजावे काय? असं केल्यानंतर संधी शोधणाऱ्या अतिरेक्यांकडून हमखास हल्ले होणारच हा पूर्वानुभव गाठीशी असल्यावर सुध्दा सैन्य हलविण्याची पूनरावृती कशासाठी करण्यात आली ? याचे उत्तर केंद्रशासनाने देशातील नागरीकांना दिले पाहिजे.

दक्षिण काश्मिरमधील अनंतगाम जिल्ह्यातील पहलगाम पासून ६ किमीवरील बसरन व्हॅली या पर्यटनस्थळावर झालेला हा आत्मघाती हल्ला होता. ४० पेक्षा जास्त पर्यटकांच्या गटावर २-३ अतिरेक्यांनी अंधाधुंद गोळीबार केला.त्यात २६ जणांचा मृत्यू तर झाला,तर २० हून अधिक जखमी झाले. त्यांनी धर्म विचारत फक्त पुरूषांना लक्ष केले असं म्हणतात.मुळातच अतिरेकी हे सुध्दा कडवे धर्मांधच असतात.म्हणून आपण सुध्दा अधिकाधिक धर्मांध होत राहून छाती फुगवत राहण्यात का हशिल आहे?

त्या उन्मादाला जगात प्रदर्शित करण्यात अभिमान बाळगणे म्हणजे मानवी समाजावरील संकटांना अधिक गडद करण्यासारखे ठरत नाही का? समाजातील माणसं ही आज स्वार्थांध होत चालली आहेत.राजकारणी अधिकाधिक महत्वाकांक्षी होत चालालीत. सत्ताधारी सुध्दा विरोधकांचे अस्तित्व उखडून टाकण्यासाठी धर्म आणि जातीच्या नावावर वेगवेगळे डाव रचून जनतेला संमोहित करण्याचे कारनामे फक्त करत आहेत.गर्व से कहो म्हणत सामाजिक सद्भाव,शांतता आणि मानवतेला जबर आव्हानं दिली जात आहेत.आपल्या विपरीत वागण्याचे परिणाम काय होतील याची चिंता वाहण्याचे कर्तव्य सत्ताधारी पक्षाचे नेतेच आज विसरलेले आहेत.काहीही करून निर्माण केलेल्या लाटांवर आरूढ होत देशावर अधिराज्य गाजवायचे.मग त्यातील विपरीत परिणामांनी त्या देशातील निरपराध माणसांचे काहीही झाले तरी त्यांच्या जीवनाचे कुणाला काहीच देणे घेणे उरलेले नाही. देशातील या चुकीच्या प्रवाहातील फटक्यांनी धर्मांधता निर्माण करून ईतर धर्मियांना असुरक्षित करणे या उफराट्या वाटचालीनेच मानवतेला संकटात आणलेले आहे.

परंतू हे दुष्परिणाम हेच सत्त्य आहे हे पटल्यावर सुध्दा या देशातील एक संमोहित गट आजही हे सत्त्य मान्य करण्याच्या मन:स्थितीत नाहीत. हेच त्यांचे स्वतःच्या अंतरात्म्याशी सुरू असलेले स्वार्थी व्दंव्द आहे.यामुळेच हे दहशतवादी तुमच्या पंतप्रधानांना जाऊन सांगा म्हणत देशातील या अतिरेकी उन्मादाचे हेच ते परिणाम पटवून देण्यासाठी सांगून हल्ले घडवित आहेत. देशातील अराजकता ही वाढत जात आहे. बाहेरील विध्वंसक दहशतवादी शक्तीकडून हे अंतर्गत धार्मिक उन्मादानेच मानवतेवर होणारे क्रूर हल्ले आहेत....!

**- संजय एम.देशमुख,**
**निंबेकर** (ज्येष्ठ पत्रकार) अकोला
मोबा.क्र.९८८१३०४५४६,
E- mail - sanjaymdeshmukh11gmail.com

# राष्ट्रवादी पक्षाने समाजातील मागास, उपेक्षित व दुर्बल घटकाला न्याय दिला



इस्लामपूर : राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाने सातत्याने सामाजिक बांधिलकी जपत समाजातील मागास, उपेक्षित व दुर्बल घटकाला न्याय दिला आहे. राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या सामाजिक न्याय विभागाचा सांगली येथील मेळावा जोरदार करू,असा निर्धार इस्लामपूर येथे पक्षाच्या कार्यकर्त्यांनी व्यक्त केला. सामाजिक न्याय विभागाचे शहर जिल्हाध्यक्ष,माजी नगरसेवक उत्तम कांबळे, ग्रामीण जिल्हाध्यक्ष कुमार लोंढे (कसबे डिग्रज) यांनी कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केले. प्रा.शामराव पाटील,राज्य सरचिटणीस अरुण कांबळे,महिला जिल्हाध्यक्षा सुस्मिता जाधव,इस्लामपूर शहराध्यक्ष शहाजी पाटील, युवक तालुकाध्यक्ष संग्राम जाधव,माजी उप नगराध्यक्ष शंकरराव चव्हाण,सामाजिक न्याय विभागाचे तालुकाध्यक्ष शैलेंद्र सुर्यवंशी,माजी सरपंच विजय लोंढे (सर),शहराध्यक्ष गोपाळ नागे प्रामुख्याने उपस्थित होते. राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष,माजी मंत्री आ.जयंतराव पाटील यांच्या प्रमुख्य उपस्थितीमध्ये सांगली येथे सामाजिक न्याय विभागाचा मेळावा घेत आहोत. त्याच्या तयारीसाठी संपूर्ण जिल्ह्यात आमचा संपर्क दौरा सुरू आहे.

आम्हास सर्व स्तरातून मोठा प्रतिसाद मिळत असून सांगली चा मेळावा जोरदार करू,असा विश्वास कांबळे,लोंढे यांनी व्यक्त केला. अरुण कांबळे म्हणाले,इस्लामपूर येथील शासकीय वस्तीगृहातील अनागोंदी कारभारा बद्दल सांगली जिल्हाधिकारी यांना निवेदन देणार आहोत. प्रारंभी तालुकाध्यक्ष शैलेंद्र सुर्यवंशी यांनी स्वागत व प्रास्ताविक भाषणात संघटनेच्या वाटचालीचा आढावा मांडला. शहराध्यक्ष गोपाळ नागे यांनी आभार मानले. याप्रसंगी दीपक कांबळे कार्वे, विनय बनसोडे भडकंबे, जंबु पांढरबळे चिकुर्डे, संजय बल्लाळ कापुसखेड,दीपक भंडारे तांबवे, रणजित कांबळे बोरगाव,जितेंद्र आष्टेकर आष्टा, एन. व्ही.सुर्यवंशी साखराळे यांच्यासह वाळवा तालुक्यातील पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# संधीचे सोने करणं ही यशाची गुरुकिल्ली : स्मिता झिमरे

घोगाव : श्री संतकृपा अभियांत्रिकी महाविद्यालयात आयोजित राज्यस्तरीय State Level Technical Event मध्ये प्रमुख अतिथी म्हणून मार्गदर्शन करताना सौ. स्मिता झिमरे यांनी विद्यार्थ्यांना प्रेरणादायी विचार दिले. त्या म्हणाल्या, संधी आणि सुर्योदय या दोघांमध्ये एकच साम्य आहे - जाग येणाऱ्यालाच त्याचा लाभ मिळतो. झोपेत असणाऱ्यांना ना संधी मिळते, ना सुर्योदय दिसतो.



आजच्या तरुण पिढीने संधीचे महत्त्व ओळखून तिचा योग्य वापर करायला हवा, असे सांगत त्यांनी आपल्या वैयक्तिक अनुभवातून यशाकडे जाणाऱ्या वाटचालीतील संधींचा उपयोग कसा करावा याचे मार्गदर्शन केले. संधी कोणत्याही वेळी, कोणत्याही स्वरूपात येते. तिचा योग्य उपयोग करून आपण आपल्या जीवनात यशस्वी होऊ शकतो. मात्र संधी गमावल्यास पश्चात्तापाशिवाय काही उरत नाही, असे त्यांनी स्पष्टपणे विद्यार्थ्यांना सांगितले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे प्राचार्य डॉ. स्वानंद कुलकर्णी होते. यावेळी त्यांनी स्पर्धेत सहभागी विद्यार्थ्यांना शुभेच्छा व्यक्त केल्या. महाविद्यालयाच्या विविध विभागांचे प्रमुख यावेळी उपस्थित होते. त्यामध्ये कंप्युटर सायन्स विभागाचे प्रमुख प्रा. संतोष पतंगे, इलेक्ट्रिकल विभागाचे प्रमुख प्रा. सागर माळी, सिव्हिल विभागाचे प्रमुख प्रा. महेश रेणके, मेकॅनिकल विभागाचे प्रमुख प्रा. भरतराज भोसले तसेच बेसिक सायन्स अँड ह्युमॅनिटी विभागाचे प्रमुख प्रा. शीतल औटे यांचा समावेश होता.

यावेळी प्रमुख अतिथी चे स्वागत प्रा. संतोष पतंगे यांनी केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक आणि सूत्रसंचालन सेजल पाटील यांनी केले. शिकण्याची तयारी आणि जिद्द असेल तर कोणतीही अडचण यशाच्या मार्गात अडथळा ठरत नाही, असा सकारात्मक संदेश त्यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना दिला. या State Level Technical Event मध्ये विविध महाविद्यालयातील १२५ विद्यार्थी सहभागी झाले होते. महाविद्यालयाच्या कंप्युटर, इलेक्ट्रिकल, सिव्हिल आणि मेकॅनिकल या चार विभागांनी संयुक्तपणे केले होते. या कार्यक्रमात Career Quest, Art Fusion, Shark Tank, आणि Project Exhibition यासारख्या विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले.

यामध्ये विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवून आपली सर्जनशीलता, कल्पकता आणि तांत्रिक कौशल्ये सादर केली. या राज्यस्तरीय स्पर्धेसाठी संस्थेच्या अध्यक्षा डॉ.उषा जोहरी, सचिव श्री प्रसून जोहरी यांनी विशेष सहकार्य करून सहभागी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी भाग्यश्री पाटील व त्यांच्या टीमने विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाच्या शेवटी सेजल पाटील हिने उपस्थितांचे आभार मानून कार्यक्रमाची सांगता केली.

# जावलीत २५ एप्रिलला सरपंच पदांची सोडत

सातारा : शासनाकडून प्राप्त झालेल्या सरपंच आरक्षणानुसार जावली तालुक्यामध्ये सरपंच आरक्षणाच्या जागा निश्चित करुन प्रवर्ग निहाय वाटप करण्यात आलेल्या आहेत. सन २०२५ ते २०३० या कालावधीत निवडणूक होणाऱ्या १२५ ग्रामपंचायतीसाठी सरपंच पदासाठी सोडत २५ एप्रिल २०२५ रोजी पंचायत समिती सभागृह जावली (मेढा) येथे सकाळी ११.३० वाजता घेण्यात येणार असल्याची माहिती जावली (मेढा)तहसीलदार हणमंत कोळेकर यांनी दिली आहे. सरपंच आरक्षण सोडतीसाठी जावली तालुक्यातील१२५ ग्रामपंचायतीसाठी आरक्षित पदाचा तपशील पुढीलप्रमाणे अनूसचित जातीसाठी महिला ५ व खुला ४, अनुसूचित जमातीसाठी महिला १ व खुला १, नागरिकांच्या मागास प्रवर्गासाठी महिला १७ व खुला १६, सर्वसाधारण प्रवर्गासाठी महिला ४१ व खुला ४० अशा प्रकारे सरपंच आरक्षण सोडत होणार आहे.

# वाळवा येथील ९४ ग्रामपंचायत सरपंच पदांची सोडत

इस्लामपूर : वाळवा तालुक्यातील ९४ ग्रामपंचायत सरपंच पदांसाठी सन २०२५ ते २०३० दरम्यान सार्वत्रिक निवडणूक द्वारे गठीत होणाऱ्या ग्रामपंचायत सरपंच पदासाठी आरक्षण सोडत काढण्यात आली. उपविभागीय अधिकारी श्रीनिवास अर्जुन यांच्या मार्गदर्शनाखाली तहसीलदार सचिन पाटील यांच्या उपस्थितीत ही आरक्षण सोडत काढून ग्राम पंचायत निहाय आरक्षण जाहीर करण्यात आले.

९४ ग्रामपंचायतीच्या व थेट जनतेतून निवड होणाऱ्या सरपंच पदाची आरक्षण सोडत ईश्वरपूर येथील राजारामबापू नाट्यगृहात सकाळी ११ वाजता पार पडली. गाव पातळीवरील ग्रामपंचायत सरपंच पद हे अतिशय महत्त्वाचे असल्याने या आरक्षण सोडतीकडे तालुक्यातील गाव पातळीवरील राजकारणाचे लक्ष लागले होते. दरम्यान, थेट जनतेतून सरपंच पदाची निवड असल्याने ग्रामीण भागातून येणाऱ्या विविध राजकीय नेते मंडळीची उपस्थिती कमी जाणवली.

आजच्या सरपंच पदाच्या सोडतीनंतर अनेकांचा भ्रमनिरास झाला तर अनेकांना याची लॉटरी लागली. अपेक्षेप्रमाणे सरपंचपद आरक्षित झाले त्या गावातील कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वात आहे. मात्र अपेक्षेप्रमाणे सरपंचपद आरक्षित न झाल्याने काही गावातील कार्यकर्त्यांमध्ये भ्रमनिरास झाल्याचे चित्र आज दिसून आले. दरम्यान, थेट जनतेतून सरपंच पदाची निवड असल्याने ग्रामीण भागातून येणाऱ्या विविध राजकीय नेते मंडळीची उपस्थिती कमी जाणवली.

गावनिहाय पडलेले आरक्षण असे : (महिला ५० टक्के आरक्षण), अनुसूचित जाती - ११ (६), अनुसूचित जमाती - १ (०), नागरिकांचा मागास प्रवर्ग (ओबीसी) - २६ (१३), खुल्या जागेसाठी - ५६ (२८).

अनुसूचित जाती : काळमवाडी, गोंडवाडी, मर्दवाडी, लवंडमाची, वाघवाडी, अनुसूचित जाती- महिला : कारंदवाडी, पडवळवाडी, विठ्ठलवाडी, ढगेवाडी, साटपेवाडी, जुनेखेड.

अनुसूचित जमाती : कापूसखेड, नागरिकांचा मागास प्रवर्ग : भडकंबे,लाडेगांव, बागणी, नागांव, कणेगांव, कोरेगांव, मालेवाडी, शेणे, बेरडमाची, काकाचीवाडी, केदारवाडी, फाळकेवाडी, घबकवाडी, नागरिकांचा मागास प्रवर्ग - महिला : पोखर्णी, रेठरेधरण, शिरटे, ओझर्डे, कामेरी, मिरजवाडी, नेर्ले, ठाणापुडे, चिकुर्डे, शिरगांव, इटकरे, फार्णेवाडी (शि.), जक्राईवाडी.

सर्वसाधारण : ताकारी, नरसिंहपूर, बिचूद, कासेगांव, साखराळे, तांदुळवाडी, बावची, येडेनिपाणी, वाटेगांव, किल्लेमच्छींद्रगड, रेठरेहरणाक्ष, शिगांव, नवेखेड, गोटखिंडी, हुबालवाडी, बनेवाडी, भाटवाडी, कुंडलवाडी, येडेमच्छिंद्र, भवानीनगर, खरातवाडी, मसूचीवाडी, गाताडवाडी, शेखरवाडी, भरतवाडी.

सर्वसाधारण - महिला : कोळे, कार्वे, देवर्डे,कुरळप, ऐतवडे बु., बहे, सुरूल, तुजारपूर, ऐतवडे खु., वशी, पेठ, करंजवडे, दुधारी, बोरगांव, येलूर, रोझावाडी, तांबवे, ढवळी, बहादुरवाडी, वाळवा, माणिकवाडी, फार्णेवाडी बो., अहिरवाडी, महादेवाडी, मरळनाथपूर, धोत्रेवाडी, नायकलवाडी, जांभुळवाडी.

दैनिक कृष्णा एक्सप्रेस हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक आणि मालक गोरख काशिनाथ तावरे यांनी सक्सेस प्रिंटर्स, फा. प्लॉट नंबर १२६/३अ, प्लॉट नंबर ८, कृष्णा कॅनॉल, सैदापूर ता. कराड जि. सातारा पिन - ४१५१२४ येथे छापून, ३७५, गाळा नंबर ४ शनिवार पेठ, कराड ता. कराड जि. सातारा - ४१५११० येथून प्रकाशित केले. ※ संपादक - गोरख काशिनाथ तावरे

DAILY KRISHNA EXPRESS Printer, Published and Owner by Gorakh Kashinath Taware Pritnted at Success Printers F. plot No. 126/3A, Plot No.8, Krishna Canol Saidapur, Tal- Karad, Dist- Satara Pin-415124, and Published at 375, Shop No.4, Shaniwar Peth, Karad, Tal- Karad, Dist.- Satara 415 110. Editor - Gorakh Kashinath Taware

# ९१ ग्रामपंचायतपैकी शिराळात ४५ वर महिलाराज

शिराळा : शिराळा तालुक्यातील ९१ ग्रामपंचायत सरपंच आरक्षण सोडत तहसील कार्यालयात संपन्न झाली. या सोडतीमध्ये ९१ पैकी ४५ ग्रामपंचायतींवर महीला राज आले आहे.आरक्षण सोडत सकाळी अकरा वाजता सुरू झाली. यामध्ये अनुसूचित जातींमध्ये ९ पैकी ५ जागांवर महिला आरक्षण याबरोबर मागास प्रवर्ग २५ पैकी १२ तर सर्वसाधारणमध्ये ५७ पैकी २८ ठिकाणी महीला आरक्षण पडले आहे.

अंत्री खुर्द(सर्वसाधारण स्त्री), अंत्री बुद्रुक(सर्वसाधारण ), अस्वलेवाडी(अनुसूचित जाती स्त्री), आंबेवाडी (सर्वसाधारण स्त्री), आरळा (सर्वसाधारण), इंगरुळ(सर्वसाधारण), उपवळे (सर्वसाधारण स्त्री), औंढी (सर्वसाधारण स्त्री), कणदूर (सर्वसाधारण), कदमवाडी (सर्वसाधारण), करमाळे (सर्वसाधारण स्त्री), करुंगली (ना.मा. प्रवर्ग), कांदे (सर्वसाधारण स्त्री), कापरी (सर्वसाधारण), काळुंद्रे (अनुसूचित जाती), किनरेवाडी (सर्वसाधारण स्त्री), कुसळेवाडी (सर्वसाधारण), कुसाईवाडी (ना.मा.प्रवर्ग), कोंडाईवाडी (सर्वसाधारण स्त्री), कोकरुड (ना.मा.प्रवर्ग), खराळे (सर्वसाधारण), खिरवडे (सर्वसाधारण स्त्री), खुंदलापुर (ना.मा.प्रवर्ग), खुजगांव (सर्वसाधारण स्त्री), खेड (ना.मा.प्रवर्ग), गवळेवाडी (ना.मा.प्रवर्ग स्त्री), गिरजवडे (सर्वसाधारण स्त्री), गुढे (अनुसूचित जाती), घागरेवाडी (सर्वसाधारण स्त्री), चरण (ना.मा.प्रवर्ग), चिंचेवाडी (सर्वसाधारण), चिंचोली (सर्वसाधारण), चिखलवाडी (सर्वसाधारण स्त्री), चिखली (सर्वसाधारण), जांभळेवाडी (सर्वसाधारण), टाकवे (ना.मा.प्रवर्ग), ढोलेवाडी (सर्वसाधारण स्त्री), तडवळे (सर्वसाधारण), देववाडी (अनुसूचित जाती स्त्री), धसवाडी (ना.मा.प्रवर्ग स्त्री), धामवडे



(सर्वसाधारण), नाटोली (सर्वसाधारण स्त्री), नाठवडे (ना.मा.प्रवर्ग स्त्री), निगडी (अनुसूचित जाती स्त्री), प. त. शिराळा (सर्वसाधारण स्त्री), प.त. वारुण (सर्वसाधारण स्त्री), पाचगणी (ना.मा.प्रवर्ग स्त्री), पाचुंब्री (ना.मा.प्रवर्ग स्त्री), पाडळी (ना.मा.प्रवर्ग स्त्री), पाडळेवाडी(ना.मा. प्रवर्ग स्त्री), पावलेवाडी (सर्वसाधारण स्त्री), पुनवत (ना.मा.प्रवर्ग स्त्री), फकिरवाडी (सर्वसाधारण स्त्री), फुफीरे (सर्वसाधारण), बांबवडे (सर्वसाधारण स्त्री), बिऊर (अनुसूचित जाती बिळाशी (सर्वसाधारण), बेलदारवाडी (ना.मा.प्रवर्ग स्त्री), बेलेवाडी (सर्वसाधारण), भटवाडी (ना.मा.प्रवर्ग), भाटशिरगाव (ना.मा. प्रवर्ग स्त्री) भैरववाडी (सर्वसाधारण), मणदूर (ना.मा.प्रवर्ग), मराठेवाडी (ना.मा.प्रवर्ग), मांगरूळ (सर्वसाधारण स्त्री), मांगले (सर्वसाधारण), मादळगांव (सर्वसाधारण), मानेवाडी (सर्वसाधारण), माळेवाडी (अनुसूचित जाती), मेणी (सर्वसाधारण), मोरेवाडी (सर्वसाधारण), मोहरे (सर्वसाधारण), येळापुर (सर्वसाधारण स्त्री), रांजणवाडी (ना.मा.प्रवर्ग), रिळे ((ना.मा.प्रवर्ग स्त्री), रेड (सर्वसाधारण स्त्री), लादेवाडी (सर्वसाधारण), वाकाईवाडी (सर्वसाधारण), वाकुर्डे खुर्द (सर्वसाधारण), वाकुर्डे बुद्रुक (सर्वसाधारण स्त्री), वाडीभागाई (अनुसूचित जाती स्त्री), शिंदेवाडी (सर्वसाधारण स्त्री), शिरसटवाडी (सर्वसाधारण स्त्री), शिरसी (ना.मा.प्रवर्ग), शिराळे खुर्द (ना.मा.प्रवर्ग), शिवरवाडी (ना.मा.प्रवर्ग स्त्री), शेडगेवाडी (अनुसूचित जाती स्त्री), सागाव (सर्वसाधारण), सावंतवाडी (सर्वसाधारण स्त्री), सोनवडे (सर्वसाधारण), हातेगाव (सर्वसाधारण स्त्री) शिराळा तहसीलदार कार्यालय सरपंच आरक्षण सोडत उपजिल्हाधिकारी सविता लष्करे तहसीलदार शामला खोत-पाटील, नायब तहसीलदार राजेंद्र पाटील, कैलास कोळेकर, शशिकांत सूर्यवंशी, दत्तात्रय मोटे, गायत्री खटावकर, सरपंच उपसरपंच ग्रामपंचायत सदस्य यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.तर आरक्षण सोडत चिठ्ठी अनन्या हर्षल माने व सोहा सुहेल, पटवेकर यां मुलींनी काढली.

# गोरक्षनाथ यात्रेनिमित्त निकाली कुस्त्यांचे जंगी मैदान

शिराळा : ऐतिहासिक, सामाजिक, प्राचीन वारसा लाभलेल्या नागपंचमीचे ३२ शिराळा शहरांमध्ये गोरक्षनाथ यात्रा २४ एप्रिल पासून सुरू झाली असून सदर यात्रेनिमित्त मंगळवार, दि. २९ एप्रिल २०२५ रोजी निकाली कुस्त्यांचे जंगी मैदान आयोजित करण्यात आले आहे. यामध्ये महाराष्ट्र केसरी पै. पृथ्वीराज पाटील विरुद्ध महाराष्ट्र केसरी पै. हर्षद सदगीर यांची प्रथम क्रमांकाची लढत होणार असून या कुस्तीसाठी रोख २ लाख रुपयांचे बक्षीस आहे. महाराष्ट्र चॅम्पियन पै. रविराज चव्हाण विरुद्ध महाराष्ट्र चॅम्पियन पै. सतपाल सोनटक्के यांच्यामध्ये द्वितीय क्रमांकाची लढत होणार आहे, त्यासाठी रोख रु. १ लाखाचे तर पै. अमर पाटील विरुद्ध पै. दिग्विजय जाधव यांच्यामध्ये रोख रु ७५ हजाराची तृतीय क्रमांकाची कुस्ती होणार आहे.

मैदानामध्ये या प्रमुख कुस्त्यांबरोबरच इतर चटकदार व नजरेचे पारणे फेडणाऱ्या कुस्त्या होणार आहेत. आकर्षक विद्युत रोषणाई, डीजे, प्रेक्षकांच्या बैठक व्यवस्थेसाठी गॅलरीची व्यवस्था, खुमासदार सूत्रसंचालन असे नेटके संयोजन करण्यात आले आहे.




सदर कुस्ती मैदानाच्या नियोजनासाठी मा. रणजितसिंह नाईक (भैय्या), युवा नेते पृथ्वीसिंग नाईक (बाबा), पै. उत्तम निकम (नाना) दीपक गायकवाड (अण्णा), सम्राट शिंदे (सरकार), महेश पाटील, प्रा. सागर नलावडे, सचिन नलावडे (काका), उत्तम डांगे, प्रा. सुशीलकुमार गायकवाड, पै. अभिजीत शेणेकर, पै. सचिन नलावडे, पै. अक्षय शिंदे, तसेच हनुमान व्यायाम मंडळ नायकुडपुरा, यात्रा कमिटी व सर्व ग्रामस्थ शिराळा यांचे मोलाचे योगदान लाभत आहे. कुस्ती शौकिनांना या खुमासदार कुस्त्यांचा लाभ घेण्याचे आवाहन संयोजकांमार्फत करण्यात आले आहे.

# सफाई कर्मचाऱ्यांना सोयी...

(पान १ वरून) लावू नयेत, असेही श्री. डागोर यांनी सांगितले.

सफाई कर्मचाऱ्यांना एका वर्षामध्ये २२ सुट्ट्या देय आहेत शासकीय सुट्याही असतात. पण त्यांना सुट्टीच्या दिवशीही कामावर बोलावले जात असल्यास सुट्टीच्या कामाचा आर्थिक मोबदला द्यावा. सफाई कर्मचाऱ्यांची वारसांना हक्काने नोकरी देय आहे, मुलांच्या शिक्षणानुसार त्यांना रिक्त पदांवर सामावून घ्यावे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर श्रम साफल्य योजनेंतर्गत सफाई कर्मचाऱ्यांना घरे उपलब्ध करुन द्यावीत. १ मे कामगार दिनी उत्कृष्ट सफाई कर्मचाऱ्यांचा सत्कार करावा, असे निर्देशही श्री. डागोर यांनी दिले.

जिल्हाधिकारी श्री. पाटील म्हणाले, स्व. क्रांतिसिंह नाना पाटील सर्वसाधारण रुग्णालयात काम करणारे सफाई कर्मचारी शासकीय निवास्थानात राहत आहेत. त्या ठिकाणी नवीन निवासस्थाने बांधण्यात येणार आहेत. सफाई कर्मचाऱ्यांची दुसऱ्या ठिकाणी तात्पुरती सोय करावी. सफाई कर्मचाऱ्यांना सफाई शिवाय अन्य कोणतेही काम सांगू नये. सर्व नगर पालिका व नगर पंचायतींनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर श्रम साफल्य योजनेची प्रभावी अंमलबजावणी जिल्ह्यात करावी, असेही जिल्हाधिकारी श्री. पाटील यांनी सांगितले.

# खटाव तालुक्यातील १३३ गावच्या सरपंच पदाची सोडत जाहीर


वडूज : दत्ता इनामदार खटाव तालुक्यातील १३३ गावांच्या सरपंचपदाची आरक्षण सोडत येथे झाली. त्यामध्ये अनुसूचित जाती महिला व पुरूष प्रवर्गासाठी प्रत्येकी सहा ग्रामपंचायती, नागरिकांचा इतर मागासवर्ग महिलांसाठी (ओबीसी महिला) १८ जागा, ओबीसी खुला प्रवर्गासाठी १७ जागा तसेच सर्वसाधारण महिला गटासाठी ४३ व सर्वसाधारण गटासाठी ४३ जागांचा समावेश आहे.

अनुसूचित जाती महिला प्रवर्गासाठी आरक्षित झालेल्या ग्रामपंचायती पुढीलप्रमाणे : भूषणगड, कोकराळे, त्रिमली, धारपुडी, तडवळे, निमसोड. अनुसूचित जाती पुरूष प्रवर्ग : कणसेवाडी, गारवडी, सुर्याचीवाडी, वर्धनगड, दरजाई, शेनवडी, नागरिकांचा मागास महिला प्रवर्ग : अनफळे, गोपूज, विखळे, सिध्देश्वर कुरोली, चोराडे, अंभेरी, लोणी, गणेशवाडी, जायगाव, दहिवड, खातवळ, मोराळे, रणसिंगवाडी, एनकूळ, नेर, तरसवाडी, चितळी, वरूड. ओबीसी सर्वसाधारण प्रवर्ग : कलेढोण, पळसगाव, पोफळकरवाडी, रेवली, निढळ, वडी, अंबवडे, मांडवे, राजापूर, कारंडेवाडी, राजाचेकुर्ले, उंचीठाणे, हिंगणे, डिस्कळ, शिंदेवाडी, विसापूर, लाडेगाव. सर्वसाधारण महिला राखीव गट : पाचवड, रहाटणी, गुरसाळे, पुसेसावळी, येरळवाडी, वांझोळी, कळंबी, ललगुण, कटगुण, पडळ, पुसेगाव, पेडगाव, जाखणगाव, पांढरवाडी, गारळेवाडी, नढवळ, मरडवाक, नांदोशी, धकटवाडी, पवारवाडी, डांभेवाडी, पारगाव, चिंचणी, मोळ, गारूडी, गिरीजाशंकरवाडी, डाळमोडी, मुसांडवाडी, वाकेश्वर, मांजरवाडी, गुंडेवाडी, खबालवाडी, वेटणे, रेवलकरवाडी, जांब, नागनाथवाडी, गोसाव्याचीवाडी, गादेवाडी, धोंडेवाडी, काळेवाडी, भोसरे, खातगुण, ढोकळवाडी.

सर्व साधारण खुला प्रवर्ग : खटाव, कामथी तर्फ परळी, गोरेगाव (वांगी), पळशी, पिंपरी, मायणी, दातेवाडी, यलमरवाडी, उंबर्डे, नायकाचीवाडी, बोंबाळे, मानेवाडी, तुपेवाडी, भुरकवडी, उंबरमळे, हिवरवाडी, फडतरवाडी (बुध), नवलेवाडी, पांगरखेल, वाकळवाडी, दरूज, शिरसवडी, औंध, फडतरवाडी (नेर), अनपटवाडी, बुध, नागाचे कुमठे, वडगाव (जयराम स्वामींचे), पुनवडी, कातरखटाव, गोरेगाव (निमसोड), मुळीकवाडी, कान्हरवाडी, होळीचागाव, येळीव.

# भाजपच्या खटाव तालुका अध्यक्षपदी अनिल माळी

वडूज – भारतीय जनता पार्टीच्या खटाव तालुका अध्यक्षपदी वडूजचे माजी सरपंच, नगरसेवक अनिल माळी यांची निवड करण्यात आली आहे. दरम्यान अनिल माळी यांच्या निवडीने कार्यकर्त्यांनी मोठा जल्लोष मध्ये स्वागत केले.



निवडी नंतर प्रसार माध्यमाशी बोलताना अनिल माळी म्हणाले गेले अनेक वर्ष मी भाजप विचारधारेशी जोडलेला कार्यकर्ता आहे. भारतीय जनता पार्टी सत्तेत आल्यापासून तळागाळातील कार्यकर्त्यांना मोठी संधी मिळत आहे. केंद्र व राज्य शासनाने विविध समाजातील लोकांच्यासाठी कल्याणकारी योजना लागू केल्या आहेत. त्या योजनाच्या माध्यमातून कुटुंबाला आधार मिळू लागला आहे. या योजना प्रत्येक वाडी वस्ती, गावात शेतकरी, वृद्ध,युवक, महिलायांच्यापर्यत पोहचवण्यासाठी आपला प्रयत्न आहे. ज्या लोकांना समस्या आहेत, योजना संदर्भात मदत हवी आहे. त्यासाठी वडूज येथे येऊन भाजप कार्यालयात माहिती दिल्यास त्या गरजूना निश्चित मदत करण्यात येईल. अशी ग्वाही अनिल माळी यांनी दिली.

अनिल माळी यांच्या निवडीबद्दल ग्रामीण विकास मंत्री जयकुमार गोरे, माजी आमदार डॉ दिलीप येळगावकर, जिल्हा अध्यक्ष धैर्यशील कदम माजी अध्यक्ष विकल्प शहा, धनंजय चव्हाण, शहर अध्यक्ष प्रदीप शेटे, भाजप नगरसेवक आदींनी अभिनंदन केले.

# महाराष्ट्र स्थापनेचा ६५ वा वर्धापनदिन साजरा होणार

पुणे : महाराष्ट्र राज्य स्थापनेचा ६५ वा वर्धापन दिन समारंभ गुरुवार १ मे २०२५ रोजी सकाळी ८ वा. पोलीस संचलन मैदान, शिवाजीनगर येथे होणार असून उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री अजित पवार यांच्या हस्ते शासकीय ध्वजारोहण होणार आहे. यावेळी राष्ट्रध्वजास मानवंदना, पोलीस दल, गृहरक्षक दल, नागरी संरक्षण दल आदींचे संयुक्त संचलन होणार असून श्री. पवार या प्रसंगी मानवंदना स्वीकारणार आहेत. शासकीय ध्वजारोहण समारंभास केंद्र व राज्य शासनाच्या विविध विभागाचे प्रमुख, प्रादेशिक प्रमुख, कार्यालयीन प्रमुख, पुणे शहरातील विविध क्षेत्रातील मान्यवरांनी सकाळी ७.४५ वा. वेळेत उपस्थित राहावे, असे आवाहन निवासी उपजिल्हाधिकारी ज्योती कदम यांनी केले आहे.

# ऊस विकास योजना राबवण्याचे काम हाती : विराज नाईक



शिराळा :'विश्वास' मार्फतच्या 'समृद्ध शेतकरी अभियान' अंतर्गत चार ते पाच वर्षाचा विचार करून ऊस विकास योजना राबवण्याचे काम हाती घेतले आहे. त्यास चांगले यश येत आहे, असे प्रतिपादन कारखान्याचे संचालक विराज नाईक यांनी केले.

चिखली (ता. शिराळा) येथील बाबसो ईश्वरा पाटील यांच्या ऊस शेतीस शिवार फेरी (प्रात्यक्षिक ऊस शेतीला भेट) अंतर्गत भेट देण्यात आली. त्या निमित्ताने झालेल्या कार्यक्रमात ते बोलत होते. व्ही.एस. आय. पुणेचे माजी शास्त्रज्ञ एस. बी. माने-पाटील प्रमुख मार्गदर्शक होते.संचालक श्री. नाईक म्हणाले, विश्वासराव नाईक सहकारी कारखान्याने सुरू केलेल्या 'समृद्ध शेतकरी अभियान' अंतर्गत शेतकऱ्यांना बांधापर्यंत पोहोचून तज्ज्ञां मार्फत मार्गदर्शन केले जात आहे. मार्गदर्शन असेच चालू राहणार आहे. अभियानात सहभागी ऊस शेतीची संख्या वाढवण्यासाठी ऊस विकास विभाग अधिक कार्यक्षम करणार आहे. निवडल्या जाणाऱ्या ऊस शेतीला संपूर्ण निविष्ठा कारखाना मार्फत देण्याचा विचार आहे. एक दोन वर्षामध्ये अभियानाचे परिणाम दिसून येत नाहीत. त्यासाठी चार ते पाच वर्षाचा विचार करून ऊस विकास योजना राबवण्याचे काम हाती घेतलेले आहे. शेतकऱ्यांना दिल्या जाणाऱ्या मार्गदर्शक तत्त्वानुसार शेती केल्यास अपेक्षित उत्पन्न काढता येऊ शकेल. शास्त्रज्ञ श्री. माने-पाटील म्हणाले, 'विश्वास' कारखाना राबवत असलेला या उपक्रमामुळे तारखेला कार्यक्षेत्रातील शेतकरी आपल्या उत्पन्नामध्ये एकरी दहा ते पंधरा उत्पन्नामध्ये हमखास वाढ करू शकतो. शेतकऱ्यांनी आगामी काळामध्ये जास्तीत जास्त शेतकरी सहभागी घेणार आहे. शेतकऱ्यांनीही सहभाग नोंदवावा. अभियानांतर्गत निवडलेल्या ऊस शेतीत शिवार फेरीचे आयोजन केले होते. त्या अनुसार शेतकरी बाबासाहेब पाटील यांनी जुलै २०२४ ची लागण असून सध्या १९ पेऱ्यापर्यंत उसाची वाढ झालेली आहे. नजीकच्या काळामध्ये एकरी शंभर टनापर्यंत उत्पादनाच्या दृष्टीने नियोजन सुरू आहे.

प्रारंभी साहाय्यक ऊस विकास अधिकारी संदीप पाटील यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. यावेळी फत्तेसिंगराव नाईक दूध संघाचे संचालक बबन पाटील, शेती अधिकारी ए. ए. पाटील यांच्यासह परिसरातील शेतकरी, शेती विभागाचे इतर अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते. दीपक पाटील यांनी आभार मानले.

# वाहने सोडवून घेण्याची शेवटची संधी

पुणे : पिंपरी-चिंचवड प्रादेशिक परिवहन कार्यालयाच्या वायुवेग पथकाने थकीत कर वसुलीसाठी मोटार वाहन कायद्यातील गुन्ह्यातंर्गत कार्यालयाच्या आवारात वाहन मालक किंवा चालक यांच्या जबाबदारीवर अटकावून ठेवलेली वाहने वाहन मालकांनी तडजोड शुल्क, मोटार वाहन कर, पर्यावरण कर भरुन लिलावाच्या तारखेपर्यंत सोडवून घ्यावीत, असे आवाहन करण्यात आले आहे.

प्रादेशिक परिवहन कार्यालयाने मोटार वाहन थकीत कराच्या वसुलीसाठी अटकावून ठेवलेल्यांपैकी १४८ वाहनांच्या प्रकरणांमध्ये वाहन मालक, चालक किंवा वित्तदात्यांनी कार्यालयाशी संपर्क साधून वाहने सोडवून घ्यावीत. या वाहनांच्या जाहीर लिलावाची प्रक्रिया बुधवार, ३० एप्रिल आणि शुक्रवार, २ मे २०२५ होणार आहे. या वाहनांची यादी प्रादेशिक परिवहन कार्यालय, पिंपरी-चिंचवड, संत नगर, मोशी प्राधिकरण, पिंपरी-चिंचवड कार्यालय आणि तळेगाव व राजगुरुनगर (खेड) एसटी आगाराच्या कार्यालयाच्या सूचना फलकावर प्रदर्शित केलेली आहे.

अधिक माहितीकरीता https://eauction.gov.in आणि www.mstcindia.co.in या संकेतस्थळावर भेट द्यावी. तसेच प्रादेशिक परिवहन कार्यालय, पिंपरी-चिंचवड, संत नगर, मोशी प्राधिकरण, पिंपरी-चिंचवड ०२०-२७२३२८२८ या दूरध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन उप प्रादेशिक अधिकारी राहुल जाधव यांनी केले आहे.

# अक्षय्य तृतीयेचे महत्त्व

वैशाख शुक्ल पक्षाच्या तिसऱ्या दिवशी अक्षय्य तृतीया हा सण साजरा केला जातो. अक्षय्य तृतीयेचा दिवस हा त्रेतायुगाचा प्रारंभ दिवस मानला जातो.

या दिवशी केलेल्या शुभकर्माचे शाश्वत असे फळ मिळते. 'न क्षय इति अक्षय' म्हणजे ज्याचा कधीही क्षय होत नाही तो अक्षय होय.

या दिवशी केलेली उपासना, दान हे सर्व अक्षय्य होते. महर्षी वेदव्यास यांनी अक्षय्य तृतीयेच्या दिवसापासूनच महाभारत हा ग्रंथ लिहायला सुरुवात केली.

अक्षय्य तृतीयेच्या दिवशी माता गंगा स्वर्गातून पृथ्वीवर अवतरली. अक्षय्य तृतीया हा दिवस माता अन्नपूर्णेचा अवतरण दिवस मानला जातो.

**– भीमराव साळुंखे, सातारा.**

# चालकांनी गणवेश परिधान करणे अनिवार्य

पुणे : महाराष्ट्र मोटार वाहन नियम, १९८९ नुसार परवानाधारक ऑटोरिक्षा व टॅक्सी चालकांनी व्यवसाय करीत असतांना 'पांढऱ्या रंगाचा शर्ट (बुश शर्ट) व खाकी रंगाची पँट' असा गणवेश परिधान करण्यासोबतच ओळखपत्र प्रदर्शित करणे अनिवार्य आहे, असे उप प्रादेशिक परिवहन अधिकारी स्वप्नील भोसले यांनी स्पष्ट केले आहे.

प्रादेशिक परिवहन कार्यालयामार्फत ऑटोरिक्षा, टॅक्सी विशेष तपासणी मोहीम राबविण्यात येणार आहे. ऑटोरिक्षा, टॅक्सी परवानाधारकांच्या वाहनाचे योग्यता प्रमाणपत्र नूतनीकरणाचे कामकाजासह मोटर तपासणीचे कामकाज करताना गणवेश परिधान करुन आपली गैरसोय टाळावी. ऑटोरिक्षा, टॅक्सी परवानाधारक वाहनचालकांनी आपल्या वाहनाची वैध कागदपत्रे सोबत बाळगावीत. तपासणीमध्ये दोषी आढळणाऱ्या चालकांवर मोटार वाहन कायदा व प्राधिकरणाने विहित कलेल्या तरतुदीनुसार कारवाई करण्यात येईल, याची नोंद घ्यावी, असेही श्री. भोसले यांनी प्रसिद्धी पत्रकान्वये कळविले आहे.

# ऑनलाईन वीजबिल भरणाऱ्या ३०५ वीज ग्राहकांना मिळाले स्मार्टफोन अन् स्मार्टवॉच

सातारा – राज्यातील ७० टक्क्यांपेक्षा जास्त वीजग्राहक दरमहा ऑनलाईन वीजबिल भरतात. ऑनलाईनचा हा टक्का वाढविण्याच्या हेतुने महावितरणने 'लकी डिजीटल ग्राहक योजना' जाहीर केली होती. ७ एप्रिल रोजी या योजनेची पहिली सोडत (ड्रॉ) जाहीर झाली. यामध्ये बारामती परिमंडलातील ३०५ ग्राहकांना स्मार्टफोन व स्मार्टवॉच अशी बक्षिसे मिळाली असून, प्रत्येक उपविभाग पातळीवर विजेत्या ग्राहकांना बक्षिसांचे वाटप करण्यात आले आहे. पुढील दुसरी सोडत ७ मे रोजी होणार आहे.

बारामती परिमंडलात बारामती, सोलापूर व सातारा अशी तीन मंडल कार्यालये तर त्या अंतर्गत १३ विभाग, ६१ उपविभागीय कार्यालये आहेत. ज्यांनी १ एप्रिल २०२३ ते ३१ मार्च २०२४ या वर्षभरात ऑनलाईन वीजबिल भरलेले नाही अशा ग्राहकांसाठी ही योजना आहे. १ जानेवारी २०२५ ते ३१ मे २०२५ या कालावधीत ही योजना सुरु असून, सलग तीन किंवा त्यापेक्षा अधिक वीजबिल भरणाऱ्या ग्राहकांना 'लकी डिजीटल योजनेचा' लाभ मिळणार आहे. विजेत्यांची नावे ७ एप्रिल रोजी संगणकीय प्रणालीद्वारे ऑनलाईन जाहीर करण्यात आली.सातारा मंडलात कराड, फलटण, सातारा, वडूज, व वाई असे पाच विभाग तर २३ उपविभाग आहेत. प्रत्येक उपविभागातून पहिल्या क्रमांचे १, दुसऱ्या व तिसऱ्या क्रमांकासाठी प्रत्येकी दोन विजेत्यांची निवड झाली. ज्यातून पहिल्या क्रमांकासाठी २३ स्मार्टफोन, दुसऱ्या क्रमांकासाठी ४६ स्मार्टफोन आणि तिसऱ्या क्रमांकासाठी ४६ स्मार्टवॉच अशी एकूण ११५ बक्षिसे ग्राहकांना मिळाली आहेत. प्रत्येक उपविभाग पातळीवर विजेत्या ग्राहकांना सन्मानित करुन बक्षिसांचे वाटप करण्यात आले आहे. सातारा मंडलामध्ये ८० टक्के वीजग्राहक ऑनलाईन पध्दतीने वीज बिलाचा भरणा करीत आहेत. हे प्रमाण आणखी वाढविण्यासाठी ग्राहकांना प्रोत्साहन म्हणून लकी डिजिटल ग्राहक योजना राबविण्यात येत आहे. या योजनेच्या कालावधीत ग्राहकाने नेट बँकिंग, डेबिट कार्ड, क्रेडिट कार्ड, यूपीआय, वॉलेट, कॅश कार्ड, एनएसीएच, क्यूआर कोड, एनईएफटी, आरटीजीएस इ. ऑनलाईन वीज बिल भरणा पर्याय वापरून लकी ड्रॉ महिन्याच्या अगोदर दरमहा एकप्रमाणे सलग तीन किंवा तीन पेक्षा जास्त महिने वीज बिल भरणे आवश्यक राहील.

**ग्राहकांनी ऑनलाईनला प्राधान्य द्यावे– धर्मराज पेठकर**

ग्राहकांनी रांगेत उभे राहण्यापेक्षा वेळ, श्रम व पैशांची बचत करीत डिजिटल पध्दतीने वीज बिल भरणा करावा, यासाठी महावितरणने ु.ारहरवळीलो.ळप हे संकेतस्थळ व महावितरण मोबाईल पची सुविधा ग्राहकांना २४ तास उपलब्ध करून दिलेली आहे. तसेच देय रक्कमेवर ०.२५ टक्के डिजिटल वीजबिल भरणा सूट सुद्धा दिली जात असल्याचे बारामती परिमंडलाचे मुख्य अभियंता धर्मराज पेठकर यांनी सांगितले.

# मंत्री जयकुमार गोरे यांची यशदास भेट



पुणे : ग्रामविकास तथा पंचायत राज मंत्री जयकुमार गोरे यांनी राष्ट्रीय पंचायत राज दिनानिमित्त यशदा येथे आयोजित कार्यक्रमास भेट दिली. भारतीय संविधानातील ७३ व्या घटना दुरुस्तीचे स्मरण म्हणून हा दिवस साजरा करण्यात येत असून या घटना दुरुस्तीमुळे ग्रामविकासाला नवी दिशा व ग्रामीण विकासाला चालना मिळाली असल्याचे श्री. गोरे म्हणाले.

यावेळी यशदाचे महासंचालक निरंजन सुधांशू, उपमहासंचालक पवनीत कौर, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील, राज्य ग्रामीण विकास संस्थेचे उपमहासंचालक डॉ. मल्लिनाथ कलशेट्टी, पंचायत राज संचालक गिरीश भालेराव उपस्थित होते. राष्ट्रीय पंचायत दिनानिमित्त शुभेच्छा देऊन श्री. गोरे म्हणाले, यशदा ही देशाला दिशा देणारी संस्था आहे. या संस्थेतून प्रशिक्षण घेतलेले अधिकारी सर्वोच्च पदावर काम करत आहेत. शासन विविध योजनांद्वारे ग्रामविकासाला चालना देत असून ग्रामविकास विभागाकडून समृद्ध ग्राम योजना राबविण्यात येणार आहे. या योजनेची संकल्पपूर्ती अंतिम टप्प्यात आहे.

प्रारंभी श्री.गोरे यांनी स्व. यशवंतराव चव्हाण यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करुन आदरांजली वाहिली. तसेच २६ व २७ एप्रिल रोजी होणाऱ्या राज्यस्तरीय कार्यशाळेच्या तयारीची पाहणी केली.

# आधार नोंद अद्ययावतीकरण शिबीर



पुणे : जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांच्या आदेशानुसार पुणे शहर तहसिल कार्यालयामार्फत संजय गांधी निराधार व श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजनेअंतर्गत लाभार्थ्यांचे आधार नोंद अद्ययावतीकरण शिबीराचे घोलेरोड क्षेत्रिय कार्यालय, पुणे महानगरपालिका, शिवाजीनगर येथे आयोजित करण्यात आले. या शिबारात एकूण ५६ दिव्यांग नागरिकांच्या थेट खात्यात रक्कम जमा करण्यात आली.

यावेळी सेवा हक्क आयोगाचे राज्य आयुक्त दिलीप शिंदे, महापालिका सहाय्यक आयुक्त,गोविंद दांगट, संजय गांधी योजना तहसिलदार सुधाकर मागाडे, नायब तहसिलदार प्रशांत मिस्त्री यांच्यासह आदी उपस्थित होते.

श्री.शिंदे यांनी शिबीराचे निरिक्षण करुन महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ बाबत लाभार्थ्यांना मार्गदर्शन केले.

# भाजपाच्या सत्यजित पाटील, कुलदीप निकम यांचा सत्कार



शिराळा : शिराळा विधानसभा मतदार संघ भारतीय जनता पार्टीच्या शिराळा मंडल (ग्रामीण ) अध्यक्षपदी सत्यजित अशोकराव पाटील व शिराळा शहर मंडल अध्यक्षपदी कुलदीप निकम यांची निवड करण्यात आली. यावेळी आमदार सत्यजित देशमुख, सांगली जिल्हा भाजपा अध्यक्ष दिपक शिंदे, भाजपा युवा नेते सम्राट महाडीक, भाजपा जिल्हा उपाध्यक्ष जयराज पाटील प्रमुख उपस्थित होते. यावेळी सत्यजित पाटील व कुलदिप निकम यांचा सत्कार मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला.

आमदार सत्यजित देशमुख म्हणाले, पक्षातंर्गत निवडणूक कार्यक्रम सुरु आहे. तरुण कार्यकर्त्यांना संधी देण्याचा पक्षाचे धोरण असून त्यानुसार या निवडी करण्यात आले आहेत. मिळालेल्या संधीचा उपयोग सर्वसामान्य लोकांच्या सेवेसाठी करा.शासनाच्या योजनांचा लाभ गरीब व गरजू लोकांना मिळवून देण्यासाठी काम करा. पक्ष संघटन मजबुत करण्याकडे लक्ष द्या असे आवाहन आमदार देशमुख यांनी केले.


भाजपा जिल्हाध्यक्ष दिपक शिंदे म्हणाले :- भाजपा सर्वात जास्त सभासद नोंदणी असणारा पक्ष आहे. लोकशाही पद्धतीने निवडणूक प्रकीया होत आहे. पक्ष तरुण चेहऱ्याना कामाची संधी होत आहे. सम्राट महाडीक म्हणाले :- भाजपा पक्षाचे धोरण कार्यकर्तांना ताकद देण्याचे आहे. मिळालेल्या संधी उपयोग पक्ष वाढीसाठी करा. असे आवाहन सम्राट महाडीक यांनी केले. यावेळी माजी जि. प. सदस्य संपतराव देशमुख, माजी सभापती हणमंतराव पाटील, सुखदेव पाटील, सम्राटसिंह शिंदे,चंद्रकांत पाटील, बसवेश्वर शेटे, बाळासाहेब खोत, संभाजी नलवडे, भिमराव पाटील,प्रदीप पाटील, किरण पाटील आदी उपस्थित होते.

# रद्दी खरेदीसाठी दरपत्रके सादर करावेत

नवी मुंबई : विभागीय माहिती कार्यालयातील मासिके, मराठी, हिंदी, इंग्रजी जुन्या वर्तमानपत्राची रद्दी विहीत पध्दतीचा अवलंब करुन विक्री करावयाची आहे. ही वर्तमानपत्राची रद्दी दि.२५ एप्रिल ते दि. २८ एप्रिल २०२५ या कालावधी शनिवार-रविवार व इतर सार्वजनिक शासकीय सुट्टीचे दिवस सोडून कार्यालयीन वेळेत पाहण्यासाठी उपलब्ध असेल.

इच्छुक रद्दी खरेदीदारांनी कार्यालयीन वेळेत आपले सिलबंद लिफाफ्यातील दरपत्रक विभागीय माहिती कार्यालय,कोकण भवन,तिसरा मजला रुम नंबर ३१७, बेलापूर,नवी मुंबई येथे सोमवार दि.२८ एप्रिल २०२५ पर्यंत जमा करावे, असे आवाहन कोकण विभागाचे उपसंचालक(माहिती) यांनी केले होते आहे.

# हरहुन्नरी कलावंत ईश्वरी रविंद्र लोहोटे




कराड : ईश्वरी रवींद्र लोहोटे एक कलागुणसंपन्न नृत्यांगना आणि गोड गळ्याची गायिका. जणू काही वैखरीवर सरस्वतीचा वास आहे की काय असं भासणारी गोड गळ्याची गायिका म्हणजेच ईश्वरी. आतापर्यंत ईश्वरीने अनेक गायन आणि नृत्य स्पर्धेत सहभागी होऊन अव्वल नंबर मिळवून अनेक पुरस्कार संपादन केले आहेत. तिच्या या कलेचे मुंबईतूनच नव्हे तर महाराष्ट्रातून देखील कौतुक होत आहे.

ईश्वरीने आपल्या कला कारकीर्द मध्ये विविधांगी कार्यक्रम केले असून त्यांत एकेरी गायन स्पर्धा, ग्रीटिंग कार्ड बनविणे, वक्तृत्व स्पर्धा, हस्ताक्षर स्पर्धा, समूह गायन स्पर्धा अशा अनेकविध कार्यक्रमांचा समावेश आहे. ईश्वरीने आतापर्यंत अशा अनेक स्पर्धेमध्ये प्राविण्य मिळवून आपली एक वेगळी ओळख निर्माण केली आहे.

शालेय शिक्षण पूर्ण करता करता आपली आवडही जोपासण्याचा प्रामाणिक प्रयत्न ईश्वरीने केला आहे आणि आजतागायत ती करत आहे. आपली गायनकला आणि नृत्यकला अंगीकारत असताना ईश्वरीला सामाजिक कार्याची आवड देखील तितकीच महत्वाची वाटते. मग त्यासाठी अनाथाश्रम आणि वृद्धाश्रमात जाऊन गोरगरिबांना फळे वाटप, अन्नधान्य वाटप करत समाजोपयोगी कार्याची जाणीव ठेवली आहे. आणि एक बाल सामाजिक कार्यकर्ती म्हणून ईश्वराची गणना होते.

आजवर ईश्वरीचे अनेक सेवाभावी संस्थेने कौतुक करून तिचा यथासांग सन्मान केला आहे त्यात प्रामुख्याने जनजागृती सेवा समिती, बदलापूर, साप्ताहिक भगवे वादळ, त्याचबरोबर तिच्या दैदिप्यमान कार्याची दखल घेऊन आर्यारवी एंटरटेनमेंट प्रॉडक्शनच्या तिसऱ्या राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय लघुपट महोत्सव मध्ये तिला नुकताच कलाभूषण हा पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. बालवयातच कलात्मक धोरण अवलंबून सामाजिक बांधिलकी जपणारी ईश्वरी ही एक गुणी आणि हरहुन्नरी कलावंत आहे.

# कराडमध्ये समान संधी केंद्राद्वारे शिष्यवृत्ती मार्गदर्शन कार्यशाळा



कराड : रयत शिक्षण संस्थेचे, सदगुरू गाडगे महाराज महाविद्यालय, कराड मधील समान संधी केंद्राद्वारे बीबीए व बीसीए विभागातील भाग-१ च्या विद्यार्थ्यांकरिता शिष्यवृत्ती मार्गदर्शन कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेसाठी प्रमुख वक्ते म्हणून प्राध्यापक जी. एस. बनसोडे, समन्वयक, समान संधी केंद्र, सदगुरू गाडगे महाराज महाविद्यालय, कराड, श्री. अविनाश जावीर, सदस्य, समान संधी केंद्र, सदगुरू गाडगे महाराज महाविद्यालय, कराड आणि श्री. कौस्तुभ प्रदीप कुर्लेकर, कार्यालयीन लिपिक, सदगुरू गाडगे महाराज महाविद्यालय, कराड हे होते.

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मोहन राजमाने हे होते. प्राध्यापक श्री. एस. व्ही. बनसोडे यांनी त्यांच्या भाषणामध्ये शिष्यवृत्तीची पार्श्वभूमी, इतिहास, आजच्या काळातील गरज तसेच महत्व, उपलब्ध असणाऱ्या शिष्यवृत्तींची माहिती दिली. दुसऱ्या सत्रात श्री. अविनाश जावीर यांनी विविध शिष्यवृत्तींसाठी लागणारी आवश्यक कागदपत्रे, पात्रता तसेच त्याअनुषंगाने महाडिबीटी ऑनलाईन पोर्टल व शिष्यवृत्ती पोर्टल वर विविध शिष्यवृत्ती योजनांसाठी अर्ज सादर करण्याकरिता आवश्यक मार्गदर्शन केले. तसेच राज्यशासन केंद्रशासन यांच्या शिष्यवृत्ती वगळता अन्य खाजगी शिष्यवृत्तींचीदेखील माहिती दिली. कार्यशाळेच्या तिसऱ्या सत्रामध्ये श्री. कौस्तुभ प्रदीप कुर्लेकर यांनी शिष्यवृत्ती ऑनलाईन अर्ज प्रक्रियेच्या अनुषंगाने आवश्यक बाबींवर प्रकाश टाकला. अध्यक्षीय मनोगतात प्राचार्य डॉ. मोहन राजमाने म्हणाले की, सदगुरू गाडगे महाराज महाविद्यालय, कराड शासनस्तरीय तसेच खाजगी शिष्यवृत्ती योजना राबविण्यामध्ये प्रमुख भूमिका पार पाडते. तसेच अधिकाधिक विद्यार्थ्यांनी उत्सुर्फपणे या संधीचा लाभ घेतला पाहिजे जेणे करून या शिष्यवृत्तींचा लाभ बहुतांश विद्यार्थ्यांना होईल. उपप्राचार्य श्री. एस. ए. पाटील यांनी शिष्यवृत्तींसाठी आवश्यक तांत्रिक मदत व उद्भवणाऱ्या अडीअडचणींकरिताचे मार्गदर्शन सद्गुरू गाडगे महाराज महाविद्यालय, कराड द्वारे सर्वतोपरी केले जाईल याची ग्वाही दिली. सदर कार्यक्रमाचे प्रास्ताविक व स्वागत व पाहुण्यांचा परिचय बीबीए विभागप्रमुख प्रा.सौ.एस.व्ही.संकपाळ यांनी केले. तर आभार श्रीमती जे.एस. सुर्यवंशी यांनी केले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन बी.सी.ए. विभागप्रमुख प्रा. श्रीमती एन. एस. थोरात यांनी केले. सदर कार्यक्रमास बी.बी.ए. आणि बी.सी.ए. विभागातील भाग-१ चे सर्व विद्यार्थी, शिक्षक सहकारी उपस्थित होते.

# गोंदिया जिल्ह्यातील डव्वा/स ग्रामपंचायत राष्ट्रीय पंचायत पुरस्काराने सन्मानित

## हवामान कृती विशेष पुरस्कारात अव्वल



नवी दिल्ली : राष्ट्रीय पंचायत राज दिनानिमित्त देशातील विविध ग्रामपंचायतींना व तसेच संस्थांना केलेल्या उत्कृष्ट कामगिरीबद्दल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. या पुरस्कारांमध्ये राज्यातील गोंदिया जिल्ह्याच्या डव्वा/स ग्रामपंचायतीला हवामान कृती विशेष पंचायत पुरस्कार वर्ष २०२३-२४ साठी पंतप्रधान यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले.

राष्ट्रीय पंचायत राज दिन-२०२५ निमित्त मधुबनी, बिहार येथे पंचायती राज मंत्रालयाकडून हा पुरस्कार सोहळा आयोजित करण्यात आला होता. या पुरस्कार सोह्यात प्रथमच हवामान कृती विशेष पंचायत पुरस्कार, आत्मनिर्भर पंचायत विशेष पुरस्कार आणि पंचायत क्षमता निर्माण सर्वोत्तम संस्था पुरस्कार या श्रेणींमध्ये पुरस्कार प्रदान करण्यात आले. हवामान कृती विशेष पंचायत पुरस्कार श्रेणीत गोंदिया जिल्ह्यातील डव्वा/स ग्रामपंचायती उत्कृष्ट कामगिरी केली असून, सर्वोत्तम स्थान मिळवले आहे. हा पुरस्कार ग्रामपंचायतच्या सरपंच योगेश्वरी चौधरी यांनी पंतप्रधानांच्या हस्ते स्वीकारला. पुरस्काराचे स्वरुप १ कोटी रुपये रोख पारितोषिक, मानचिन्ह आणि प्रमाणपत्र असे आहे.

गोंदिया जिल्ह्यातील सडक अर्जुनी तालुक्यातील डव्वा/स ग्रामपंचायतीने हवामान कृती विशेष पंचायत पुरस्कार मध्ये प्रथम क्रमांक पटकावून राज्याचाच नव्हे तर देशाचा गौरव वाढवला आहे. पर्यावरण संवर्धन आणि शाश्वत विकासाच्या दिशेने प्रभावी पावले उचलत हवामान बदल विरुद्ध त्यांनी प्रभावीरित्या राबवलेल्या उपाययोजना राष्ट्रीय पातळीवर आदर्श ठरल्या आहेत.

डव्वा/स ग्रामपंचायतीने विविध नाविन्यपूर्ण उपक्रमांद्वारे गावात पर्यावरणपूरक जीवनशैली रुजवली आहे. गावातील प्रत्येक घरात सौर ऊर्जेचा वापर वाढावा यासाठी विशेष प्रोत्साहन देण्यात आले असून, प्लास्टिक व फटाक्यांवर संपूर्ण बंदी लागू करण्यात आली आहे. यामुळे गावाचा कार्बन फूटप्रिंट लक्षणीयरित्या कमी झाला आहे.

निसर्गातील पंचतत्त्वांचे - पृथ्वी, वायू, जल, अग्नी आणि आकाश - संवर्धन करण्यासाठी जैवविविधता जपणारे उपक्रम प्रभावीपणे राबविले गेले. ग्रामपंचायतीच्या या यशामागे सरपंच योगेश्वरी चौधरी आणि ग्रामपंचायत अधिकारी सिंधू सूर्यवंशी यांचे नेतृत्व महत्त्वाचे ठरले आहे. गावकऱ्यांनी एकजुटीने या उपक्रमांमध्ये सहभाग घेत पर्यावरण संरक्षणाची जबाबदारी आपल्या खांद्यावर घेतली. या सर्व उपक्रमांची दखल घेत ११ एप्रिल २०२५ रोजी भारत सरकारच्या निरीक्षण पथकाने -श्रीमती अनुराधा आणि श्रीमती नीलिमा गोएल यांनी डव्वा/स ग्रामपंचायतीची पाहणी केली. त्यांनी ग्रामपंचायतीच्या कार्याचे मन:पूर्वक कौतुक करत, अन्य गावांसाठी हे एक उत्तम उदाहरण असल्याचे ही मत व्यक्त केले.



## आज पुन्हा येवतेश्वर डोंगर वणव्याच्या भक्षस्थानी...

सातारा शहर परिसराला सात डोंगरांचा अतिशय सुरेख निसर्गाचा सहवास लाभला आहे. मात्र सध्या एकीकडे उन्हाची रणरण वाढत असतानाच अजिंक्यतारा, यवतेश्वर, जरंडेश्वर यासारख्या महाकाय डोंगरांवर दुपारच्या वेळी वणवे लागले जात आहेत .

आज बुधवारी दुपारी शहराच्या पश्चिम बाजूला असणाऱ्या यवतेश्वर डोंगराला मोठ्या प्रमाणात आग लागल्याचे सातारा शहरात दिसून येत होते .या वणव्यात शेकडो दुर्मिळ वृक्ष तसेच वनस्पती, प्राणी, कीटक यांना आपला जीव गमवावा लागला .याबाबत पर्यावरण प्रेमी नागरिकांनी मोठी खंत व्यक्त केली असून काही वेळेला पावसाळ्यानंतर हिरवे गवत चांगले उगवते या भ्रामक कल्पनेतून अनेक विध्वंसक प्रवृत्तीचे लोक हे डोंगर गवत जाळण्यासाठी पेटवून देतात. त्यामुळे आता तरी सुधारा व आपला निसर्ग वाचवा अशी हाक हे पर्यावरण प्रेमी देत आहेत. फोटो.. अतुल देशपांडे ,सातारा.

# गुप्तचर यंत्रणेतील त्रुटी सरकारला ...

(पान १ वरून) सरकारच्या बाजूने असल्याचे आणि सरकारच्या सर्व निर्णयांना पाठिंबा असल्याचे जाहीर केले.

**सैन्य का तैनात नव्हते?**

बैठकीत विरोधी पक्षांनी प्रश्न उपस्थित केला की, ज्या ठिकाणी एवढ्या मोठ्या संख्येने पर्यटक आले होते, तिथे सैन्य किंवा सुरक्षा का तैनात नव्हती? तसेच, गुप्तचर संस्था काय करत होत्या? बहुतांश पक्षांनी गुप्तचर यंत्रणेतील त्रुटी आणि तेथे योग्य सुरक्षा तैनातीचा मुद्दा उपस्थित केला.

**म्हणून सैनिक तैनात नव्हते**

यावर सरकारने सांगितले की, साधारणपणे जून महिन्यात अमरनाथ यात्रा सुरू होते, अमरनाथ यात्रेचे यात्रेकरू या ठिकाणी विश्रांती घेतात, तेव्हाच हा मार्ग उघडला जातो आणि या भागात सैन्य तैनात करण्यात येते. पण, यंदा स्थानिक टूर ऑपरेटर्सनी खूप लवकर सरकारला न कळवता पर्यटकांचे बुकिंग घेण्यास सुरुवात केली, त्यामुळेच २० एप्रिलपासून पर्यटकांनी तिथे येणे सुरू केले. स्थानिक अधिका-यांनाही याची माहिती नव्हती आणि त्यामुळे तिथे सैन्याची तैनाती करण्यात आली नाही, अशी माहिती सरकारने दिली.

**बैठकीला कोणते नेते उपस्थित होते?**

सर्वपक्षीय बैठकीत सरकारच्या वतीने संरक्षण मंत्री राजनाथ सिंह, गृहमंत्री अमित शाह, परराष्ट्र मंत्री एस जयशंकर, अर्थमंत्री निर्मला सीतारमण आणि संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू उपस्थित होते. तर, विरोधकांकडून राज्यसभेतील विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खर्गे आणि लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधीसह अनेक नेते उपस्थित होते.

# महाबळेश्वर तालुक्यातील सरपंच पदाची आरक्षण सोडत

महाबळेश्वर : महाबळेश्वर तालुक्यामध्ये एकुण ७९ ग्रामपंचायतीचे आरक्षण सरपंच पदाची सोडत दि. २३ एप्रिल २०२५ रोजी नियंत्रण अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी सातारा अभिषेक देशमुख यांच्या उपस्थितीमध्ये खादी ग्रामद्योग मंडळ मध संचालनालय सभागृह, महाबळेश्वर येथे पार पाडण्यात आल्याची माहिती महाबळेश्वर तहसिलदार तेजस्विनी खोचरे-पाटील यांनी दिली.

एकुण ७९ ग्रामपंचायतीमध्ये सरपंचांची पदे अनु. जाती- एकूण ०६ (३ महिला व ३ खुला) अनु. जमाती साठी एकुण ५ (३) महिला व २ खुला), ना.मा.प्र साठी एकुण २१ (११ महिला व १० खुला), सर्वसाधारण साठी एकुण ४७ (२४ महिला व २३ खुला) इतकी पदे मंजुर करण्यात आलेली आहेत. महाबळेश्वर तालुक्यातील एकुण ७९ ग्रामपंचायतीमध्ये सोडतीद्वारे अनु.जाती महिला शिदी, गुरेघर, गोडवली (एकूण-३),रेणोशी, वानवली तर्फ सोळशी, राजपुरी (एकूण-३), अनु. जमाती महिला- माचुतर, सौंदरी, उचाट (एकूण-३), अनु. जमाती- आमशी व भोसे (एकूण-२),नागरिकांचा मागास प्रवर्ग -१. नागरिकांचा मागास प्रवर्ग महिला पिंपरी तर्फ तांब, मेटगुताड, अहिर, आकल्पे, मिलार, कोट्रोशी, बिरवाडी, आरय, तळदेव, पारपार, दुधगाव (एकूण-११), दांडेघर, झांजवड, येणे बु, कुमठे, कुंभरोशी, पाली तर्फ आटेगाव, कुरोशी, वेंगळे, चतुरबेट, गोगवे (एकूण १०), सर्वसाधारण -१. सर्वसाधारण महिला भेकवली, कासवंड, नार्किदा, आचली, देवसरे, शिरवली, वाळणे, कळमगाव, दाभेदाभेकर, देवळी, रुळे, वारसोळी देव, जावली, मांघर, निवळी, रामेघर, खरोशी, दाभेदाभेमोहन, खिंगर, क्षेत्र महाबळेश्वर, मोळेश्वर, घावरी, पारुट, आंब्रळ (एकूण २४), मोरणी, एरंडल, मेटतळे, हरचंदी, सोनाट, गावढोशी, अवकाळी, गोरोशी, भिमनगर, दानवली, उंबरी, तायघाट, पांगारी, वेळापुर, खांबील चोरगे, वलवण, हातलोट, सालोशी, चिखली, लाखवङ, पर्वत तर्फ वाघवळे, बिरमणी, लामज (एकूण २३) सरपंच पदे निश्चित करून जाहीर केले.

सरपंच आरक्षण सोडतीची प्रस्तावना निवासी नायब तहसिलदार दिपक सोनावले यांनी केली. सर्व सरपंच आरक्षणाचे कामकाज नायब तहसिलदार विनोद सावंत महसूल, निवडणूक नायब तहसिलदार जहिदा शेख, तसेच कार्यालयातील महसूल अधिकारी हेमंत सुळ सहा., महसूल सहाय्यक केशव नांदेडकर व इतर सर्व महसूल कर्मचारी यांनी कामकाज पाहिले.

सरपंच आरक्षण कार्यक्रमास सर्व गावांचे ग्रामस्थ, सरपंच, राजकीय पदाधिकारी, ग्रामपंचायत सदस्य, पोलीस पाटील, पत्रकार, मंडल अधिकारी, ग्राम महसूल अधिकारी, ग्राम अधिकारी उपस्थित होते.